म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : वा.को.
दा. क्र. : १८४७

# पेशवाईतील रत्ने

BVBK-0401847

# अनुक्रम


- गोपिकाबाई पेशवे
- मानाजी फाकडा
- घाशीराम कोतवाल
- त्रिंबकजी डेंगळे
- एल्फिन्स्टनसाहेब
- बाळाजीपंत नातू
- इब्राहिमखान गारदी
- शाहीर प्रभाकर

पेशवाईतील रत्ने

उपेक्षितांच्या अंतरंगात शिरून
माणुसकीचा गहिवर आणणारा
थोर साहित्यिक
कै. श्री. म. तथा बापूसाहेब माटे
यांच्या पवित्र स्मृतीस–

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय [illegible]
दा. क्र. ९८४५ दिनांक
विषय बा-वा क्र.

BVBK-0401847

# पुरस्कार

श्री. म. श्री. दीक्षित यांनी ' पेशवाईतील रत्ने ' या नावाने प्रस्तुत पुस्तक तयार केले आहे आणि त्यात १. गोपिकाबाई, २. मानाजी फाकडा, ३. घाशीराम कोतवाल, ४. त्रिंबकजी डेंगळे, ५. एल्फिन्स्टनसाहेब, ६. बाळाजीपंत नातू, ७. इब्राहिमखान गारदी आणि ८. प्रभाकर शाहीर अशी आठ छोटी चरित्रे एकत्र गोविली आहेत. चरित्रे छोटीच आहेत आणि ती इतिहासाची आवड असणाऱ्या सामान्य वाचकांसाठी लिहिलेली आहेत.

' पेशवाईतील रत्ने ' असे नाव दिले तरी या मालेत गुंफलेली प्रत्येक व्यक्ती उत्तर पेशवाईतील आहे, आणि त्यातही दोन काळ कल्पिले तर उत्तर काळाच्याही उत्तर किंवा अंत्य विभागातच पडणारी आहेत. हा काळ काही पेशवाईपुरते बोलावयाचे तरी देखील मोठा उज्ज्वल ठरणारा नाही. चरित्रासाठी निवडलेल्या बहुतेक व्यक्ती प्रसिद्ध असल्या तरी संस्मरणीय कोटीतल्या नाहीत. तथापि त्यांची नावे सामान्य वाचकांच्याही कानावरून बरेच वेळी जात असतात आणि त्यामुळे त्यांची जिज्ञासा जागृत होत असली तर नवल नाही. मात्र ही जिज्ञासा सहजासहजी तृप्त करण्याचे सुलभ साधन त्यांना उपलब्ध होण्याजोगे न आढळल्याने निराशाच त्यांचे पदरी येते. शिवाय अशी चरित्रे थोडी रोचक पद्धतीने लिहिली तर वाचण्याला हलके जाते. श्री. दीक्षित यांनी हे धोरण अंगीकारून ही चरित्रमाला लिहिली आहे.

चरित्रासाठी निवडलेल्या व्यक्ती ' रत्न ' पदवीस सर्वच पात्र म्हणावयाचे तर त्यातील काहींना तरी ' रत्न 'चा हीनार्थच अधिक लागू पडेल. तथापि या सर्व व्यक्तींचे चित्रण करताना त्यांची गुणांची बाजूही दीक्षित यांनी आपल्या मताप्रमाणे वठविली आहे.

वाचकांची किंवा अभ्यासकांची एखाद्या व्यक्तीविषयी मते ही त्याच्या अभ्यासाप्रमाणे आणि दृष्टिकोनाप्रमाणे मर्यादित होतात. आधीच पेशवाईचा जो काळ या चरित्रांनी व्यापिला आहे तो घोटाळ्याचा, आणि त्या काळात पेशवाई अथवा मराठी सत्ता आतून पोखरत चालली होती. त्यामुळे पक्ष

प्रतिपक्ष, पक्षबदल, व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेचा धुमाकूळ, विलक्षण आणि धूर्त परकीयांनी या परिस्थितीचा लाभ उठवून अखेर कशी साधली तो प्रकार इत्यादी विविध घटनांनी हा काळ व्याप्त झालेला आहे. त्यामुळे अभ्यासी पंडितालाही या काळातील व्यक्तींचे हेतू शोधून, त्याची वास्तविक योग्यता ठरविणे कठिण पडते. असे असले तरी श्री. दीक्षितांसारखे जिज्ञासू आपल्या अभ्यासास अनुसरून त्या त्या व्यक्तीचे गुणावगुण ठरविल्याशिवाय कसे राहतील ?

श्री. दीक्षितांनी आमच्या कागदपत्रांच्या सूक्ष्म रानातही काही फेरफटका करून त्यांच्या मनात भरलेल्या व्यक्तींची माहिती एकत्र केली त्याबद्दल त्यांचे कौतुक केले पाहिजे. दीक्षितांनी हा उद्योग हौसेने, आपला व्यवसाय सांभाळून केला आहे, याबद्दल त्यांचे खरोखर अभिनंदन केले पाहिजे. वाढत्या व्यासंगाने वाढती योग्यता व परिपक्वता येते. वाचलेला विषय लोकरंजनासाठी अथवा लोकशिक्षणासाठी लिहून प्रसिद्ध करण्याने व्यासंगाची दृढता व उंचीही वाढण्याचा संभव अधिक असतो. श्री. दीक्षित यांचा हा छोटा ग्रंथ वाचकांना आवडेल, त्यांची मराठी इतिहासाकडील ओढ वाढवील, जिज्ञासा जागृत करील आणि अधिक अभ्यासासही कित्येकांस तरी प्रवृत्त करील ही आशा मनी बाळगून आणि दीक्षितांचे पुनः एकदा सकौतुक अभिनंदन करून हा लहानसा पुरस्कार संपवितो.

९ ऑगस्ट १९५६ — दत्तो वामन पोतदार

# या आवृत्तीविषयी थोडेसे

'पेशवाईतील रत्ने' या माझ्या पुस्तकाची ही तिसरी आवृत्ती प्रकाशित होण्याचा योग आज येत आहे ही माझ्या दृष्टीने एक मोठी आनंददायक घटना आहे.

या छोटेखानी पुस्तकातील लेख मुख्यत: प्रौढ विद्यार्थी व इतिहासाची आवड असणारा सर्वसामान्य वाचक यांचेसाठी लिहिलेले आहेत व त्यांचे स्वरुप प्राय: संकलनात्मक आहे. माहितीच्या दृष्टीने माझे असे फार अल्प आहे. मांडणी, भाषा व क्वचित् मत प्रतिपादन ही मात्र माझी. अनेक मराठी-इंग्रजी ग्रंथ व नियतकालिकांतील लेख यांच्या आधारे मी हे लेख लिहिले. या सर्व ग्रंथकारांचा व लेखकांचा मी ऋणी आहे.

महामहोपाध्याय कै. प्रा. दत्तो वामन पोतदार यांचा पुरस्कार या पुस्तकाच्या प्रथम आवृत्तीला लाभलेला होता हे मी माझे भाग्यच समजतो. पुरस्काराच्या निमित्ताने दत्तो वामनांचा घडलेला निकट सहवास माझ्या दृष्टीने केवळ अमूल्य आहे.

पहिल्या दोन आवृत्त्यांप्रमाणेच याही आवृत्तीचे वाचक स्वागत करतील अशी खात्री आहे.

८६५ (नवा) सदाशिव
पुणे ४११०३०.

म. श्री. दीक्षित

९८४५ 23/9/14

# गोपिकाबाई पेशवे

पेशवे घराण्यात ‘ध’चा ‘मा’ करणाऱ्या आनंदीबाईच्या खालोखाल कीर्ति लाभलेली स्त्री म्हणजे गोपिकाबाई पेशवे ही होय. गोपिकाबाई ही आनंदीबाईची थोरली जाऊ. नानासाहेब पेशव्यांची पत्नी आणि विश्वासराव, माधवराव व नारायणराव या मोहऱ्यांची माता होय. आनंदीबाई आणि गोपिकाबाई या दोघी जावात बऱ्याच बाबतीत साम्य होते. राजकीय महत्त्वाकांक्षेपायी दोघींनीही थोडी अपकृत्ये केली. तथापि आनंदीबाईने अपकृत्यांची कमाल करून दुष्कीर्ती ओढवून घेतली, तर गोपिकाबाईची अपकृत्ये तिच्या जावेच्या–आनंदीबाईच्या–मानाने सौम्य ठरल्याने तिची कीर्ति गालबोटाइतकीच कलंकित झाली. इतकेच नव्हे, तर गोपिकाबाईवर कोसळलेल्या कौटुंबिक आघातामुळे इतिहासाने तिच्या पदरात सहानुभूतीचे झुकते माप टाकले. गोपिकाबाई म्हणजे मूर्तिमंत दुर्दैव. दुर्दैवाचे दशावतार पाहण्यासाठीच जणू ती जगली.

इ. स. १७२५ मध्ये गोपिकाबाईचा जन्म झाला. भिकाजी नाईक रास्ते या सावकाराची ती मुलगी. लहानपणी ती मोठी चुणचुणीत आणि सुंदर दिसे. भिकाजीने शाहुराजाला दिवाळीत आपल्याकडे मेजवानीला बोलावले होते. त्यावेळी गोपिका शाहूच्या नजरेस पडली. बाजीरावाचा मुलगा बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब याला ही मुलगी पत्नी म्हणून चांगली शोभेल, असे शाहूला वाटले. राजाची इच्छा! ती फलद्रूप होण्यास किती अवकाश?

शाहूच्या मध्यस्थीने ठरलेला हा विवाह वाई येथे १० जानेवारी १७३० रोजी मोठ्या थाटात साजरा झाला. या प्रीत्यर्थ ३४३२५ रु. खर्च झाला. लग्नात गोपिकाबाई पाच वर्षांची होती, तर नानासाहेब पेशवे दहा वर्षांचे होते. या लग्नामुळेच पुढे रास्ते घराणे उदयाला आले.

गोपिकाबाई सुंदर, सशक्त, पाणीदार आणि सूज्ञ होती. पतीबरोबर ती नेहमी स्वारी–शिकारीला जात असे. बुंदेलखंडावर स्वारी असो, प्रयाग-मुक्तीची मोहीम असो, की पानपताकडे कूच असो, गोपिकाबाईने नानासाहेबांची पाठ कधी सोडली नाही. नवऱ्याच्या संगतीने तिला हळूहळू लिहितावाचता येऊ लागले आणि राजकारणही कळू लागले. पुढे पुढे राजकारणात ती नवऱ्याला सल्ला देऊ लागली; इतकेच नव्हे, तर प्रत्यक्ष राजकारणही करू लागली. स्वतःच्या शहाणपणाचा व कर्तृत्वाचा तिला अभिमान वाटू लागला आणि आपली छाप पेशवाईत उमटली पाहिजे, अशी ईर्षाही तिच्या मनात उत्पन्न झाली. कर्तृत्ववान आणि तेजस्वी स्त्रिया आपल्या नवऱ्याला मुठीत ठेवण्यात वाकबगार असतात. गोपिकाबाई या नियमाला अपवाद नव्हती. १७५० साली सातारा येथे रामराजाचा राज्यारोहणसमारंभ होता. विश्वास आणि माधव या आपल्या दोन मुलांना घेऊन गोपिकाबाई त्या समारंभाला गेली होती. ताराबाईने तिचा आणि तिच्या मुलांचा उंची पोषाख देऊन सन्मान केला. या ताराबाईशी गोपिकाबाईचे बरेच सूत होते. रामराजाच्या दत्तकप्रकरणी ताराबाईने गोपिकाबाईचा सल्ला घेतला होता. गोपिकाबाईचा राजकारणातील चंचुप्रवेश अशा किरकोळ प्रसंगांनीच होत गेला आणि पुढे जसजशी तिला संधी मिळत गेली, तसतसा तिचा वरचष्माही वाढत गेला. सदाशिवरावभाऊ हा गोपिका-बाईचा दीर. तो मोठा शूर व तेजस्वी पुरुष होता. कित्येक बाबतीत तो नानासाहेबांपेक्षाही श्रेष्ठ होता. गोपिकाबाईला मनातून अशी धास्ती वाटे की, दिराच्या वाढत्या कर्तृत्वापुढे आपल्या नवऱ्याचे तेज फिक्के पडेल की काय ? त्यामुळे तिला सदाशिवरावभाऊचा उत्कर्ष सहन होईनासा झाला. दिराविषयी आपल्या नवऱ्याचे मन कलुषित करण्याचा तिने प्रयत्न चालविला. सदाशिवरावभाऊला पेशवाई उपटण्याची महत्त्वाकांक्षा आहे, असे तिने नवऱ्याच्या मनात भरून दिले. उदगीरच्या लढाईच्या प्रसंगी सदाशिवराव-

भाऊवर मारेकरी घालण्याचा जो कट झाला, त्यात गोपिकाबाईचे अंग होते असा प्रवाद आहे. पुढे पानपतचे युद्ध ओढवले. या प्रसंगी सदाशिवरावभाऊ आणि आपला पुत्र विश्वास यांच्याकडे नानासाहेबांनी युद्धाची सूत्रे सोपविली. खुद्द नानासाहेब पानपतावर गेले नाहीत. त्यांच्या न जाण्याला गोपिकाबाई कारणीभूत झाली, असाही एक प्रवाद आहे. गोपिकाबाईवरील हे सर्व प्रवाद निखालस असत्य आहेत असे कोणीच म्हणणार नाही; या आरोपात तथ्य पुष्कळच आहे. राजघराण्यात सत्तेचा अभिलाष साधारणत: सर्व कुटुंबियांतच असतो. गोपिकाबाईसारख्या महत्त्वाकांक्षी आणि तडफदार स्त्रीच्या अंगी तो नसेल असे कसे म्हणावे ? तो असणे स्वाभाविक आहे. दिराविषयीचे तिचे वर्तन स्वार्थीपणाचे असले तरी कुटिलपणाचे नव्हते एवढे मात्र निश्चित. आपला दुसरा दीर रघुनाथराव उर्फ राघोबादादा याच्याशी तिचे संबंध ममतेचे होते. राघोबाला आपल्या या भावजयीबद्दल फार अभिमान वाटत असे. कालांतराने या दोघात वितुष्ट आले ही गोष्ट वेगळी.

पानपतच्या युद्धापासून गोपिकाबाईचे जीवन गतिमान आणि खळबळकारक झाले. युद्ध अनपेक्षितपणे अंगलट आले; इतकेच नव्हे तर युद्धात विश्वास मारला गेला. भाऊसाहेब बेपत्ता झाले, मराठ्यांची दाणादाण उडाली, लाख बांगडी फुटली. विश्वासरावासारखे सोळासतरा वर्षांचे साहसी आणि देखणे पोर गोळी लागून मारले गेल्यामुळे नानासाहेबांना आणि विशेषत: गोपिका-बाईला अनावर पुत्रशोक झाला. पराभवाची वार्ता कळताच नानासाहेब वीस हजार फौजेनिशी पानपताकडे निघाले. त्यांच्याबरोबर गोपिकाबाई होती, दुसरा पुत्र माधवराव होता. ग्वाल्हेरजवळ नानासाहेबांना पानपतच्या वार्ता प्रत्यक्ष कळल्या. त्या ऐकून नानासाहेबांना धक्का बसला, शोक झाला, अनावर दु:ख झाले. त्यामुळे एकाएकी त्यांची प्रकृती ढासळून गेली. पुढे जाणे व्यर्थ होते; मागे परतणेच भाग होते. नानासाहेब शोकमग्न अवस्थेत माघारी फिरले आणि १७६१ च्या जून महिन्यात पुण्यात येऊन दाखल झाले. बंधू-शोक नि पुत्र-शोक त्यांना असह्य झाला. क्षयाने थकत चाललेले त्यांचे शरीर या प्रचंड आघाताने साफ खचून गेले. अखेर २३ जून १७६१ रोजी पर्वतीवर ‘भाऊ–भाऊ’ असा शोक करीत नानासाहेबांनी प्राण सोडला. या प्रसंगी गोपिकाबाई त्यांच्याजवळ होती. तिला अमाप दु:ख झाले. मरणापूर्वी सहा

महिने नानासाहेबांनी एका देशस्थ मुलीशी लग्न केले होते. तत्पूर्वी त्यांना नाटक–शाळांचाही नाद लागलेला होता. गोपिकाबाईच्या दुःखात या घटनांमुळे जहरीपणा आला असल्यास नवल नाही. नानासाहेबांच्या निधनानंतर कोल्हापूरच्या जिजाबाईने गोपिकाबाईला सांत्वनपर पत्र पाठविले. ते असे.

" ईश्वरे हे गोष्टी बहुत अनुचितच केली. तुम्हांस व राजश्री रघुनाथपंडित व माधवराव यांसी दुःखाच्या कोटी जाहल्या. राजश्री सदाशिवपंडित व विश्वासराव यांचे ठिकाण न लागले ते चिंतेत निमग्न असता, ईश्वरे हा आघात प्राप्त केला. होणारास उपाये आहे असे नाही. विवेक करून शोकाचे परिमार्जन करावे, बहुत काये लिहिणे."

पती आणि थोरला पुत्र विश्वास यांच्या निधनानंतर गोपिकाबाईवर एकामागून एक संकटे कोसळू लागली. नानासाहेबांच्या मृत्यूनंतर पेशवाईतील भाऊबंदकीने डोके वर काढले. राघोबाला पेशवाईची हाव सुटली. पण माधवरावापुढे त्यांचे काही चालेना. चुलत्यापुतण्यात सत्तेसाठी स्पर्धा सुरू झाली. राघोबा माधवरावाला नानातऱ्हांनी छळू लागला आणि पेशवाईच्या चालत्या गाड्याला खीळ घालू लागला. आरंभी आरंभी माधवराव राघोबाशी नमते घेई आणि त्याच्या तंत्राने वागे. मानी गोपिकाबाईला माधवरावाचे हे पडखाऊ धोरण पसंत नसे. राघोबाचा राजकारणातील हा लांडा कारभार तिला सहन होईना. ती माधवरावाला वारंवार जागे करी आणि त्याला राजकारणात सल्लामसलत देई. माधवराव हा आपल्या आईप्रमाणेच मानी आणि करारी होता. वेळकाळ व प्रसंग पाहून राघोबाशी तो नमून वागत होता, इतकेच. काही काळ राघोबाची नजरकैद भोगण्याचेही त्याच्या व गोपिकाबाईच्या नशीबी आले होते. पण पुढे अनुकूल संधी येताच माधवरावाने राघोबाला दूर सारले आणि राज्याची सारी सूत्रे आपल्या हाती घेतली. आपल्या मातेवर माधवरावाचे अपरंपार प्रेम होते. तथापि तिने राजकारणात लक्ष घालावे ही गोष्ट त्याला आवडत नसे. खाजगी आयुष्यात आईला तो मान देई; पण राजकारणात तिची उपेक्षा करी. माधवराव सूज्ञ आणि स्वतंत्र बाण्याचा होता.

राज्यकारभारातील माधवरावाची निःस्पृहता वाखाणण्याजोगी होती. अपराधी, मग तो कोणीही असो, त्याला माधवराव कडक शिक्षा करी. गोपिकाबाईचा भाऊ रास्ते याने नियमाप्रमाणे फौज ठेवली नाही आणि हिशेब दाखविले नाहीत, तेव्हा माधवरावाने आपल्या आईची विनवणी धुडकावून लावून; रास्तेमामाची भर दरबारात कानउघडणी केली आणि त्याचा सरंजाम जप्त केला. या घटनेने गोपिकाबाईला कळून चुकले की, आपला हा पुत्र आपल्याला जुमानीत नाही. पुत्रापुढे आपले काही चालत नाही असे पाहून ती त्राग्याने नाशिकजवळ गंगापूर येथे निघून गेली, ती पुण्याला परत आली नाही. माधवरावाने गंगापूरला तिची व्यवस्था उत्तम ठेवली होती. तिथे तिला एक प्रशस्त वाडा बांधून दिला आणि सालीना ३४ हजारांचे उत्पन्न करून दिले. जरूर तेव्हा दोघात पत्रव्यवहार होई. आईने आपल्यापाशी रहावे अशी माधवरावाची फार इच्छा होती. पुण्याला येण्यासंबंधी त्याने, राघोबाने, नाना फडणीसाने तिला अनेकदा पत्रे लिहिली; पण ती करारी बाई पुण्याला म्हणून परत आली नाही. देवधर्मात ती आपला काल घालवू लागली. पुढे माधवराव क्षयाची बाधा होऊन अंथरुणाला खिळून गेला; पण तरीसुद्धा तिला पुण्याला यावेसे वाटले नाही. गंगापुराहूनच पुत्राच्या आजाराची ती आस्थेने चौकशी करी. १७६९ च्या पावसाळ्यात माधवरावाला बरे वाटावे म्हणून नाना फडणिसाला तिने पुढील कळकळीचे पत्र लिहिले :

"ब्राह्मण लावले ते अनुष्ठानसमाप्तीपर्यंत वाड्यातच राहू द्यावे. त्यांनी यजमानास आरोग्य होण्याविषयी प्रार्थना करीत जावी. आठपंधरा दिवस जास्त लागले तरी हरकत नाही. कमी पडू न द्यावे. उत्तम परीक्षेने ब्राह्मण लावावे."

पण अखेर सर्व उपाय वाया गेले आणि गोपिकाबाईचा हा थोर सुपुत्र थेऊर येथे मरण पावला. त्याची साध्वी पत्नी रमाबाई त्याच्याबरोबर सती गेली. रमाबाईशी गोपिकाबाईचे फारसे जमत नव्हतेच. माधवरावाच्या मरणाने तिचा पुत्रशोक शिगेला पोचला. ती उदास आणि बेचैन झाली. काही दिवस गंगापूर सोडून ती पंचवटीस गेली आणि भिक्षा मागून जोगिणीसारखी राहू लागली.

महिने नानासाहेबांनी एका देशस्थ मुलीशी लग्न केले होते. तत्पूर्वी त्यांना नाटक–शाळांचाही नाद लागलेला होता. गोपिकाबाईच्या दुःखात या घटनांमुळे जहरीपणा आला असल्यास नवल नाही. नानासाहेबांच्या निधनानंतर कोल्हापूरच्या जिजाबाईने गोपिकाबाईला सांत्वनपर पत्र पाठविले. ते असे.

" ईश्वरे हे गोष्टी बहुत अनुचितच केली. तुम्हांस व राजश्री रघुनाथपंडित व माधवराव यांसी दुःखाच्या कोटी जाहल्या. राजश्री सदाशिवपंडित व विश्वासराव यांचे ठिकाण न लागले ते चिंतेत निमग्न असता, ईश्वरे हा आघात प्राप्त केला. होणारास उपाये आहे असे नाही. विवेक करून शोकाचे परिमार्जन करावे, बहुत काये लिहिणे."

पती आणि थोरला पुत्र विश्वास यांच्या निधनानंतर गोपिकाबाईवर एकामागून एक संकटे कोसळू लागली. नानासाहेबांच्या मृत्यूनंतर पेशवाईतील भाऊबंदकीने डोके वर काढले. राघोबाला पेशवाईची हाव सुटली. पण माधवरावापुढे त्यांचे काही चालेना. चुलत्यापुतण्यात सत्तेसाठी स्पर्धा सुरू झाली. राघोबा माधवरावाला नानातऱ्हांनी छळू लागला आणि पेशवाईच्या चालत्या गाड्याला खीळ घालू लागला. आरंभी आरंभी माधवराव राघोबाशी नमते घेई आणि त्याच्या तंत्राने वागे. मानी गोपिकाबाईला माधवरावाचे हे पडखाऊ धोरण पसंत नसे. राघोबाचा राजकारणातील हा लांडा कारभार तिला सहन होईना. ती माधवरावाला वारंवार जागे करी आणि त्याला राजकारणात सल्लामसलत देई. माधवराव हा आपल्या आईप्रमाणेच मानी आणि करारी होता. वेळकाळ व प्रसंग पाहून राघोबाशी तो नमून वागत होता, इतकेच. काही काळ राघोबाची नजरकैद भोगण्याचेही त्याच्या व गोपिकाबाईच्या नशीबी आले होते. पण पुढे अनुकूल संधी येताच माधवरावाने राघोबाला दूर सारले आणि राज्याची सारी सूत्रे आपल्या हाती घेतली. आपल्या मातेवर माधवरावाचे अपरंपार प्रेम होते. तथापि तिने राजकारणात लक्ष घालावे ही गोष्ट त्याला आवडत नसे. खाजगी आयुष्यात आईला तो मान देई; पण राजकारणात तिची उपेक्षा करी. माधवराव सूज्ञ आणि स्वतंत्र बाण्याचा होता.

राज्यकारभारातील माधवरावाची निःस्पृहता वाखाणण्याजोगी होती. अपराधी, मग तो कोणीही असो, त्याला माधवराव कडक शिक्षा करी. गोपिकाबाईचा भाऊ रास्ते याने नियमाप्रमाणे फौज ठेवली नाही आणि हिशेब दाखविले नाहीत, तेव्हा माधवरावाने आपल्या आईची विनवणी धुडकावून लावून; रास्तेमामाची भर दरबारात कानउघडणी केली आणि त्याचा सरंजाम जप्त केला. या घटनेने गोपिकाबाईला कळून चुकले की, आपला हा पुत्र आपल्याला जुमानीत नाही. पुत्रापुढे आपले काही चालत नाही असे पाहून ती त्राग्याने नाशिकजवळ गंगापूर येथे निघून गेली, ती पुण्याला परत आली नाही. माधवरावाने गंगापूरला तिची व्यवस्था उत्तम ठेवली होती. तिथे तिला एक प्रशस्त वाडा बांधून दिला आणि सालीना ३४ हजारांचे उत्पन्न करून दिले. जरूर तेव्हा दोघात पत्रव्यवहार होई. आईने आपल्यापाशी रहावे अशी माधवरावाची फार इच्छा होती. पुण्याला येण्यासंबंधी त्याने, राघोबाने, नाना फडणीसाने तिला अनेकदा पत्रे लिहिली; पण ती करारी बाई पुण्याला म्हणून परत आली नाही. देवधर्मात ती आपला काल घालवू लागली. पुढे माधवराव क्षयाची बाधा होऊन अंथरुणाला खिळून गेला; पण तरीसुद्धा तिला पुण्याला यावेसे वाटले नाही. गंगापुराहूनच पुत्राच्या आजाराची ती आस्थेने चौकशी करी. १७६९ च्या पावसाळ्यात माधवरावाला बरे वाटावे म्हणून नाना फडणिसाला तिने पुढील कळकळीचे पत्र लिहिले :

"ब्राह्मण लावले ते अनुष्ठानसमाप्तीपर्यंत वाड्यातच राहू द्यावे. त्यांनी यजमानास आरोग्य होण्याविषयी प्रार्थना करीत जावी. आठपंधरा दिवस जास्त लागले तरी हरकत नाही. कमी पडू न द्यावे. उत्तम परीक्षेने ब्राह्मण लावावे."

पण अखेर सर्व उपाय वाया गेले आणि गोपिकाबाईचा हा थोर सुपुत्र थेऊर येथे मरण पावला. त्याची साध्वी पत्नी रमाबाई त्याच्याबरोबर सती गेली. रमाबाईशी गोपिकाबाईचे फारसे जमत नव्हतेच. माधवरावाच्या मरणाने तिचा पुत्रशोक शिगेला पोचला. ती उदास आणि बेचैन झाली. काही दिवस गंगापूर सोडून ती पंचवटीस गेली आणि भिक्षा मागून जोगिणीसारखी राहू लागली.

माधवरावानंतर तिचा तिसरा पुत्र नारायणराव गादीवर आला. नारायणरावाच्या कारकीर्दीत ती एकदा पुण्याला येऊन गेली. पुढे आनंदीबाईने कारस्थान रचून नारायणरावाचा वध करविला. व अशा प्रकारे गोपिकाबाईचा तिसरा पुत्रही काळाने ओढून नेला. काही काळ राघोबाच्या नावे पेशवाईची द्वाही फिरली; नाना, बापू आदींनी बारभाईचा व्यूह रचून नारायणरावांच्या तान्ह्या मुलास पेशवाईची वस्त्रें दिली आणि त्याच्या नावाने कारभार सुरू केला. राघोबाला रामशास्त्र्यांनी देहान्त प्रायश्चित्ताची शिक्षा सुनावल्यामुळे तो पुणे सोडून इंग्रजांच्या आश्रयाला गेला. गोपिकाबाईचे आपल्या नातवावर—सवाई माधवरावावर—फार प्रेम होते. ती पंचवटी सोडून पुन्हा गंगापूरच्या वाड्यात आली. तिथून ती सवाई माधवरावाच्या शिक्षणाकडे जातीने लक्ष पुरवी. त्याचा खोडकर स्वभाव आणि शिक्षणातली मंदगति पाहून तिला वाईट वाटे. गंगापुरातील तिचे सारे आयुष्य आता ईश्वरचिंतनात, भजनपूजनात व दानधर्मांत जात असे. पतिनिधनाने आणि पुत्रशोकाने ती खचून गेली होती. गंगापूरच्या वास्तव्यात आपली दासी येसूबाई हिच्या मुलाच्या लग्नात तिने पुढाकार घेतला आणि त्यासाठी २५०० रुपये खर्च केले.

गोपिकाबाईचा करारी स्वभाव शेवटपर्यंत कायम होता. राघोबादादा कोपरगावला हरि हरि करीत वास्तव्य करण्यापूर्वी तिला एकदा भेटायला गेला होता, पण तिने त्याची भेट साफ नाकारली. शेवटी हरिपंताने मध्यस्थी केल्यावर आणि तिच्या सांगण्याप्रमाणे राघोबाने प्रायश्चित्त घेतल्यावर त्याला भावजयीची भेट मिळाली. नवलाची गोष्ट म्हणजे 'गोपिकाबाईची भेट घ्या' अशी विनंती खुद्द आनंदीबाईनेच आपल्या नवऱ्याला केली होती. वस्तुत: आनंदीबाईचे नि गोपिकाबाईचे विळ्या–भोपळ्याएवढे सख्य होते, पण तिने हा भेटीचा सल्ला दिला हे विशेष आहे. याचा अर्थ एवढाच की, गोपिकाबाईचा दरारा, तिच्या पडत्या काळातसुद्धा सर्वांना वाटत असे. राघोबा, आनंदीबाई, नाना फडणीस आणि इतर सरदार–जहागिरदार ही सारी मंडळी गोपिकाबाईला वचकून वागत. नाना फडणिसावर गोपिकाबाईचा विशेष लोभ होता. आपल्या मनाजोगी एखादी गोष्ट करून घ्यायची असली की ती नानाला कळवी. १७७२ साली कन्याविक्रयाच्या अनिष्ट

प्रथेला आळा बसावा म्हणून नानाला तिने पुढीलप्रमाणे पत्र पाठविले होते.

"समुद्रतिरी व देशामध्ये कितीका स्थली कन्येचा विक्रये करून द्रव्य घेत आहेत. याप्रमाणे अनाचार प्रवृत्त जाला आहे. यास श्रीमंतासारिखे ब्राह्मण प्रभु असता व तुम्हांसारखे ज्ञाते व सन्मार्गवर्ती विवेकी मंत्री असता हा मार्ग अनुचित, योग्य नव्हे. त्यास हृया अर्थी श्रीमंतास विनंती करून याचा बंदोबस्त करावा."

गोपिकाबाई ३ ऑगस्ट १७८८ रोजी वयाच्या ६४ व्या वर्षी गंगापूर येथे निधन पावली. तिचे उत्तरकार्य तिचे बंधु गंगाराम भिकाजी रास्ते याने यथासांग पार पाडले व त्याप्रीत्यर्थ ३३५२९ रुपये खर्च केला. तिच्या मृत्यूमुळे तिचा नातू म्हणजे नारायणरावाचा पुत्र सवाई माधवराव खरोखर पोरका झाला. आनंदीबाईने पत्र पाठवून त्याचे पुढील शब्दात सांत्वन केले.

"चिरंजीवास आईबाप भाऊ कोणीच नाही. आम्ही दूरच आहो. येक आजी तेही दूरच होती. परंतु ममतेचे तेवढेच मनुष्य होते. त्यांचाही काल झाला होता. सृष्टीची वाट हीच आहे."

गोपिकाबाईच्या एकंदर आयुष्याचा विचार करता मनाला चटका लागतो. ती जितकी महत्त्वाकांक्षी, मानी आणि करारी होती, तितकीच मत्सरी, सत्ताभिलाषी व आक्रस्ताळी होती. तिचा धार्मिक आणि कनवाळू स्वभाव मात्र मनाला भुरळ पाडतो. सामाजिक बाबतीत तिची दृष्टी विशाल होती. राजकारणात ती प्रामाणिकपणाने सल्लामसलत देई; पण आपल्या सल्ल्यानुसारच राजकारण चालले पाहिजे हा तिचा हेका उचित नव्हता. तिच्यावर कोसळलेली कौटुंबिक संकटपरंपरा इतकी भीषण होती की, तिच्या जागी अन्य कोणी स्त्री असती तर ती असल्या आघातांनी कोलमडूनच पडली असती; पण गोपिकाबाईची इच्छाशक्ती जबर होती. तिचे धर्माचरण आणि करारी वर्तन आदर्श होते. तिच्या आयुष्यवृद्धीला याच गोष्टी कारणीभूत असल्या पाहिजेत. डोळ्यादेखत पती जातो, थोरला मुलगा युद्धात मारला जातो, मधला क्षयाने झिजून मरतो, धाकटयाचा खून पडतो, दोन्ही दिरांच्या दोन तऱ्हा होतात, आणि सवत राधाबाई मरते. हे सारे कौटुंबिक आघात सोसणारी ही स्त्री आगळीच होय. तिच्या सोशिकपणाची कमाल म्हटली पाहिजे. गोपिकाबाईच्या डोळ्यातील अश्रु खरोखरच थिजून गेले असले

पाहिजेत आणि तिचे मन करपून गेले असले पाहिजे. कै. वासुदेवशास्त्री खरे यांनी ‘ गोपिकाबाईचा पुत्रशोक ’ या नावाची एक करुणोत्कट कविता रचली आहे. वाचकांनी ती कविता एकदा अवश्य वाचावी.

त्या कवितेमधील पुढील ओळी म्हणजे मातेने फोडलेला हंबरडाच होय–

शोभे ज्या अभिमन्युचीच उपमा विश्वास माझा गुणी
मानी माधव आठवीन न कसे नारायणहि मनी
एकामागुन एक नाश मुलगे माझे कसे पावले ?
हा देवा ! करण्यास नाश पुरता कैसे तुला फावले ?

० ० ०

# मानाजी फाकडा

पेशवाईत 'साडेतीन शहाणे' व 'साडेतीन राव' यांच्याप्रमाणे नाव गाजवलेली आणखी एक त्रयी आहे. ही त्रयी म्हणजे 'तीन फाकडे.' या त्रयीपैकी कॅप्टन जेम्स स्टुअर्ट ऊर्फ इष्टुर फाकडा याचे नाव सर्वश्रुत आहे. दुसरा फाकडा कान्हेरराव त्रिबक एकबोटे. १७५६ च्या सावनूरच्या लढाईत हा मारला गेला. तिसरा फाकडा म्हणजे मानाजी शिंदे ऊर्फ मानाजी फाकडा. 'फाकडा' याचा अर्थ ऐटबाज, पाणीदार, चळवळ्या असा आहे. मानाजीच्या अंगी हे सर्व गुण होतेच होते; पण याशिवाय तो एक लोकविलक्षण पुरुष होता. थोरले माधवराव व दुसरा बाजीराव या तिघांच्या कारकीर्दीत त्याचे नाव सर्वतोमुखी झाले होते. सद्‌गुण आणि दुर्गुण या दोन्हींचा तो अर्क होता असे म्हटले तरी चालेल.

मानाजीचा जन्मकाल व पूर्वचरित्र याविषयी फार थोडी माहिती इतिहासात मिळते. कन्हेरखेडचे शिंदे हे त्याचे पूर्वज. त्याच्या आजोबाचे नाव साबाजी. महादजी शिंदे ऊर्फ पाटीलबाबा नि मानाजी हे दोघे जवळचे आप्त आणि वयानेही समकालीन. मानाजीचा उदय पानिपतनंतर झालेला आढळतो. १७६३ च्या उन्हाळ्यात भोसले व निजाम यांनी महाराष्ट्रात काही ठिकाणी जी दंगल उडविली, तीत मानाजी व त्याचा आजा हे दोघ पेशव्यांविरुद्ध वागले होते, असा पुरावा सापडतो. पानिपतच्या लढाईनंतर

राघोबादादाने मानाजीला जवळ केले आणि महादजी शिंद्याला डावलून मानाजीला सरदारकी व पोषाख देऊन उत्तरेकडे पाठविले. महादजी हा पेशव्यांचा अभिमानी असल्यामुळेच राघोबाने हे कृत्य केले. या घटनेचा साहजिक परिणाम असा झाला की, मानाजी राघोबाचा पक्षपाती बनला व महादजी माधवरावाचा म्हणजे पेशव्यांचा पाठीराखा झाला. शिंद्यांच्या सरदारकीचा उपभोग मानाजीने जवळजवळ चार वर्षे (१७६४–६८) घेतला. या काळात राघोबादादाची चाकरी तो किती निष्ठेने करीत होता याचे प्रत्यंतर त्याच्या पुढील पत्रात सापडते. 'श्रीमंत राजश्री दादासाहेबांचे सेवेसी दोन वर्षे काम केले, आज्ञेत राहिलो ते जगप्रसिद्ध आहे. आम्हांपासून सेवा घडणे त्यास दोन मास जाहाले. भाषणात मनस्वीपण करावे तरी ईश्वर परिणाम लावील, धण्याचे पुण्य उपयोगी पडेल तेच खरे. खावंदाचे चेरणा-पासी येकनिष्ठता आहे. फौजेची तरतूद आजपर्यंत पाचसात हजारपर्यंत जाहाली आहे. पुढे करीतच आहो.'

माधवराव पेशवा गादीवर येऊन राज्यकारभार पाहू लागल्यावर त्याने मानाजीकडून सरदारकी काढून घेतली व ती पूर्ववत् महादजीला दिली. मानाजीला केवळ लष्करात ठेवले. सरदारकीची वस्त्रे उतरली जाताच मानाजी रुष्ट होऊन माधवरावाला त्रास देऊ लागला. महादजीशी तर त्याने वैरच धरले. परंतु माधवरावापुढे त्याची डाळच शिजेना. इतकेच नव्हे तर माधवरावाला तो वचकून राही. आपला धनी राघोबा, पेशव्याविरुद्ध जे जे करील त्याचा पाठपुरावा करीत रहाणे एवढेच त्याच्या हाती होते. राघोबा आणि त्याचा पुत्र बाजीराव या दोघांशी अखेरपर्यंत त्याने आपली निष्ठा कायम ठेवली.

सन १७७३ च्या भाद्रपदात पेशवाईतील भाऊबंदकीचा कळस झाला आणि राघोबादादा–आनंदीबाई यांनी गारद्यांकरवी आपला पुतण्या नारायण-राव याचा खून करविला. राघोबाच्या या कृत्याचा फार बभ्रा झाला. रामशास्त्री चवताळून उठले. नाना आणि सखारामबापू कमालीचे रुष्ट झाले. राघोबाला पुण्यात रहाणे अशक्य झाले. त्याने पुण्यातून पळ काढला नि गुजराथेत सुरतेला इंग्रजांचा आश्रय घेतला. राघोबा स्वस्थ बसणार नाही म्हणून नाना–बापूसारख्या बारभाईंनी त्याच्यावर फौजा पाठविल्या.

महानदीच्या तीरावर पेशव्यांचा सेनापति हरिपंत फडके आणि राघोबा यांच्यात लढाई झाली. त्यात राघोबाचा पराभव झाला. १७७६ मध्ये पुरंदरावर तह झाला व राघोबाची पेशवाईतून हकालपट्टी झाली. महानदी-वरील लढाईत राघोबाच्या बाजूने मानाजी फाकडा शौर्याने लढला. लढाईत त्याला अनेक जखमा झाल्या. १८–२–१७७५ च्या एका पत्रात या लढाईचा पुढीलप्रमाणे उल्लेख आढळतो : 'तृतीया प्रहरी आम्ही समस्त फौजसुद्धा महीपार जालों तो त्याच्या–याच्या गांठी पडल्या. च्यार घटिका लढाई चांगली जाहाली. त्यांचा मोड जाहाला. मानाजी फाकडा, सदाशिव रामचंद्र व सखाराम हरि यांस जखमा भारी लागल्या.'

राघोबा उघडा पडल्यावर त्याच्याबरोबरचे मानाजीसारखे आश्रित प्रसंग ओळखून पुण्याला बाल–पेशव्याच्या आश्रयाला आले. या प्रसंगी मानाजीचे मानी मन अर्थातच डिवचले गेले होते. मानाजी मोठा मानी व फटकळ होता; पण या वेळी तो शरणार्थी होता. या वेळची त्याची मनःस्थिती हरिपंताला लिहिलेल्या त्याच्याच एका पत्रात व्यक्त झाली आहे. ती अशी : 'इंग्रजाचे विचारे तह ठरला. श्रीमंत दादासाहेब (राघोबा) मुंबईस जाणार. आम्ही फौजेनिशी येऊन आपले हाती चाकरीचा योग घडल्यास सेवा करू, न घडल्यास घरास जाऊ. आम्हाकडे वरकडांसारखी आतबाहेर गोष्ट नाही. ज्या कमानेस तीर, तेथे लागेल दुसरे आम्हांपासून घडणार नाही. ज्यापाशी राहू त्याचा शेवट याच रीतीने लावू. पुरवेल त्याने आम्हांस पदरी बाळगावे. हे न घडल्यास ईश्वर सत्ता.'

मानाजीचे वरील उद्‍गार वरवर पहाता प्रांजळ व स्वामीनिष्ठेचे द्योतक वाटतात. तथापि मानाजीच्या उक्तीत नि कृतीत संगती थोडी असे. तो शूर, साहसी, बाणेदार व फटकळ होता. तितकाच स्वार्थी, चंचल व कपटी होता. नूतन पेशवा सवाई माधवराव व कारभारी नाना फडणीस यांची चाकरी अपरिहार्य म्हणून त्याने पत्करली होती. मनातून त्याचा ओढा राघोबा-दादाकडेच होता. मात्र आपल्या मनातील थांगपत्ता तो सहसा कुणाला लागू देत नसे. नाना फडणीस काय ते त्याला पूर्ण ओळखून होते. मानाजीच्या शौर्याच्या, साहसाच्या व आडदांडपणाच्या वार्ता, नानांच्या कानावर गेल्या होत्या. मनातून नाना त्याला भिऊनच असत. मानाजी आणि नाना यांच्या

स्वभावातील आणि परस्परसंबंधातील मर्म ज्या एका रोमहर्षक प्रसंगात व्यक्त झाले, तो प्रसंग असा :

राघोबाला सोडून मानाजी आणि त्याचे सहकारी पुरंदरवर बालपेशव्याच्या भेटीला आले, त्यावेळचा प्रसंग. नाना फडणीस बालपेशव्याला जिवापाड जपत होते. पेशव्याच्या संरक्षणासाठी नानाने पुरुषोत्तम दाजीची खास नेमणूक केली होती. हा पुरुषोत्तम दाजी धैर्यवान्, शूर व स्वामीनिष्ठ होता. मानाजी फाकडा बालपेशव्याला भेटायला येणार ही गोष्ट नानाला एक आपत्ति वाटली. नाना आधीच भित्र्या स्वभावाचे. त्यात राघोबाचा हस्तक मानाजी फाकडा याच्याशी गाठ. काही दगाफटका होईल या भीतीने नाना अस्वस्थ झाले. त्यांनी पुरुषोत्तम दाजीला बजावले, 'दाजी, मानाजी येतो आहे. त्याजबरोबर बोलावयाचा आमचा लाग नाही. आपणच बोलावे.' दाजी पडले वस्ताद. ते म्हणाले, 'चिंता नसावी. तुमचा पंचहत्यारी कसला जरी आला तरी मी डगमगणार नाही.' मग दाजींनी श्रीमंतांना (बालपेशवा सवाई माधवराव) कडेवर घेऊन कचेरीत आणून मसनदीवर (गादीवर) बसविले व स्वत: तलवार घेऊन श्रीमंतानजीक बसले. नाना फडणीस, सखारामबापू इत्यादी बारभाई उपस्थित झाले ! इतक्यात उग्र चेहऱ्याचा व धिप्पाड बांध्याचा मानाजी डेऱ्यात दाखल झाला. त्याच्या चेहऱ्यावर व शरीरावर जखमांचे व्रण दिसत होते. तो तोऱ्यात आला तो थेट श्रीमंताजवळ कुर्निसात करून बसला. इतर कोणालाही त्याने रामराम केला नाही. मग सभोंवार दृष्टी टाकून पुरुषोत्तम दाजींना तो म्हणाला, 'दाजी, मी कसा आहे तो मी तोंडाने वर्णन करावेसे नाही. परंतु मला ही बामणे (नाना-बापू वगैरे) फितूरी म्हणतात. आम्हास कोठेही चाकरी करावयाची. दादासाहेब काय नि हे पाय काय, त्यास आता पुरे. आम्ही काही आईचे पोटातून दाली (ढालतलवारीचा पट्टा) बांधून आलो नाही. यांनी आम्हांला दाली बांधली.' इतके म्हणून मानाजीने तलवार काढली नि श्रीमंतांचे पायांशी ठेवली. दरबार थोडा वेळ स्तब्ध झाला. नंतर नानाने दाजींना खुणवून सुचविले की, 'यास लौकरच जावयाचे करा.' यावर दाजींनी मानाजीचे स्वागत केले व श्रीमंतांच्याकरवी मानाजीची तलवार उचलून त्याला परत केली व अदबीने म्हटले, 'मानाजीराव, तुम्हांस फितुरी कोण म्हणतो ?

श्रीमंतांनी तुम्हांस दाली बांधली ती माघारी घ्यावयास की काय ? तुम्ही आपला सरंजाम खाऊन श्रीमंतांचे पायाशी लक्ष ठेवून स्वस्थ असावे.' दाजीच्या या आर्जवी बोलण्याने मानाजीची कळी जरा खुलली. नंतर श्रीमंतांच्या हस्ते मानाजी व त्याच्याकडील मंडळींना दाजींनी विडे दिले. मग पुन्हा कुर्निसात करून मानाजी डेऱ्याबाहेर पडला. नानांनी निःश्वास टाकला व ते म्हणाले, 'पुरुषोत्तमराव, तुम्ही होता म्हणून प्रसंग निभावला. अहो, आमच्यादेखत हा आम्हाला बामण म्हणतो.'

मानाजीबद्दल खुद्द इंग्रजांनाही मोठा विस्मय व दरारा वाटत असे. पुण्याला शनिवारवाड्यात सवाई माधवरावाचा दरबार भरला असताना रेसिडेंट म्यालेटबरोबर असणारा मेजर प्रार्मस याने त्या दरबाराचे वर्णन करताना मानाजीचे व्यक्तिचित्र पुढील शब्दात रेखाटले आहे : 'अनेक सरदारजहागिरदारांचा तो दरबार न्याहाळीत असता आमचे लक्ष एका विलक्षण पुरुषाने वेधले. मानाजी फाकडेच्या अचाट शौर्याची आमच्या बॉंबे आर्मीला चांगली माहिती होती. आता तोच प्रत्यक्ष दरबारात बसला होता. त्याचा चेहरा भव्य होता. अस्सल मराठ्याप्रमाणे सर्वांग उघडे होते. कपाळावरून व भुजांवर त्याने पिवळ्या-पांढऱ्या गंधाचे पट्टे ओढलेले होते. खांद्यावर शेल्याचा एक पदर सोडलेला होता. त्याची उग्र मूर्ति व क्रूर चेहरा पाहून अमेरिकेतील रानटी मानवाचीच आम्हाला आठवण झाली. त्याची भेदक नजर तर केवळ अविस्मरणीय होती.'

मानाजीच्या आयुष्यात आणखी दोन महत्त्वाच्या घटना सांगण्यासारख्या आहेत. त्या म्हणजे, एक त्याच्या फितुरीची व दुसरी त्याच्या धैर्याची. त्याच्या बोलण्यात अघळपघपणा व बकवा किती असे याचे प्रत्यंतर पुढील घटनेवरून कळून येईल. ज्याने आपली एकनिष्ठा दर्शविण्यासाठी पेशव्यांच्या पायाशी तलवार काढून ठेवली, तोच मानाजी १७७८ च्या अखेर कर्नाटकावरील स्वारीत हैदरअल्लीला फितुर झाला. व पेशव्यांकडील काही सरदारही त्याने फितूर केले. फितुरीच्या या कर्मास्तव १ लक्ष ११ हजार होनांची लाच त्याने हैदरअल्लीकडून घेतली. त्याची ही फितुरी वेळीच लक्षात आली म्हणून ठीक; नाहीतर पेशव्यांच्या सैन्यावर मोठेच अरिष्ट कोसळले असते. फितुरीचा सुगावा लागताच हरिपंत व परशुरामभाऊ यांनी

त्याच्या गोटावर अचानक छापा घातला. मानाजी त्यांच्या हातून निसटून पळून गेला. त्याची पत्नी, मालमत्ता व फितुरीचे द्रव्य हरिपंतांच्या हाती लागले. मानाजीच्या पत्नीला महादजी शिंद्यांच्या स्वाधीन करण्यात आले, मालमत्ता जप्त केली गेली व सापडलेल्या इतर फितुरांना तोफेच्या तोंडी देण्यात आले. मानाजीने पळ काढून प्रथम कोल्हापूरच्या छत्रपतींचा आश्रय घेतला. पुढे महादजींकडून छत्रपतींचा बंदोबस्त होताच मानाजीने पोबारा केला व पन्हाळा ते सातारा या भागात तो पुंडाई करू लागला. १७८० मध्ये तो सावंतवाडीला आला. दरम्यान १७७९ च्या जानेवारीत तळेगाव येथे इंग्रज–मराठ्यांची लढाई होऊन वडगावला तह झाला व या तहान्वये राघोबादादा महादजीच्या स्वाधीन झाला. १७८३ साली सालबाईचा तह होऊन राघोबादादाच्या सर्व नाड्या आखडल्या गेल्या व तो कोपरगावास जाऊन स्वस्थ बसला.

मानाजीचे या सर्व घटनांकडे लक्ष होते. त्याचा धसमुसळा स्वभाव त्याला स्वास्थ्य मिळू देईना. कोल्हापूरकरांशीदेखील काही कालाने त्याचे बिनसले, व त्याने पुनरपि पुंडाई आरंभिली. पण यावेळी पंढरपूर भागातील त्याची पुंडाई प्रतिनिधींनी मोडून काढली व त्याची सर्व मालमत्ता जप्त करून त्याला पळता भुई थोडी केली. त्याची घमेंड नि रग पुरती जिरून गेली. ज्यांनी राघोबाला धूळ चारली, त्यांच्यापुढे आपला निभाव लागणार नाही हे त्याला पुरते उमगले. तो पूर्ण निराधार व भटक्या बनला. पुण्याला पेशव्यांच्या नोकरीत जावे तर पेशवाईविरुद्ध पापाचा डोंगर केलेला. पण याही स्थितीत दैवाने त्याला थोडा हात दिला. खुद्द नाना फडणिसाने त्याच्या अपराधाची क्षमा करून त्याला परत पुण्याला बोलावले. निराश्रित व शरणार्थी मानाजीला अशी संधी हवीच होती. यापुढे सारे आयुष्य पुण्यात घालवावयाचे असे ठरवून तो पुण्याला आला व पेशव्यांची मर्जी राखून त्यांची सेवा करू लागला.

पुण्याच्या उर्वरित वास्तव्यात त्याने एक अमोल कामगिरी बजावली व जनतेच्या सहानुभूतीचा मोहरा पुन्हा आपल्याकडे वळविला. १७९१ च्या भाद्रपदात पुण्याचा कोतवाल घाशीराम याने दक्षिणेच्या निमित्ताने आलेल्या ३४ तेलंगी ब्राह्मणांना एका भुयारात तीन दिवस डांबून टाकले. अन्नपाणी

न मिळालेले ते ब्राह्मण जेव्हा आरडाओरड करू लागले, तेव्हा त्यांना भुयारातून काढण्याची हिंमत कुणाला होईना. घाशीराम म्हणजे कर्दनकाळ अधिकारी व नाना फडणिसाच्या मर्जीतला. त्याच्या वाटेला कोण जातो ? पण अखेर एक बहाद्दर पुढे झाला नि चारपाच असामींच्या मदतीने त्याने भुयाराची दारे फोडून १३ ब्राह्मणांची मुक्तता केली. बाकीचे २१ ब्राह्मण अन्नपाणी व हवा यावाचून तडफडून मेले. घाशीरामाच्या अमानुष व क्रूर कृत्याला वाचा फोडणारा हा बहाद्दर म्हणजेच मानाजी फाकडा. घाशीरामाच्या कृत्याची चौकशी होऊन त्याला सवाई माधवरावाने खवळलेल्या ब्राह्मणांच्या स्वाधीन केले. या ब्राह्मणांनी त्याची धिंड काढून त्याला दगडांनी ठेचून मारले. सवाई माधवरावानंतर मानाजी दुसऱ्या बाजीरावाच्या चाकरीत शिरला. बाजीरावाच्या कारकीर्दीत त्याचा भाव पुन्हा वाढला. इतका की नाना फडणीसही त्याला नमून वागू लागला.

१७९७ च्या पुढे मानाजीचा उल्लेख इतिहासात सापडत नाही. आयुष्याच्या अखेरीस महादजीशी त्याने वैर सोडले होते व महादजीच्या पश्चात् दौलतरावास त्याने चांगली मदत केली. मरणसमयी तो ७०–७२ वर्षांचा असावा. जन्माप्रमाणे त्याच्या मृत्यूसंबंधीही निश्चित माहिती मिळत नाही. शौर्य, साहस, फटकळपणा, घमेंड, स्वार्थ इत्यादी गुणांचे चमत्कारिक मिश्रण असणाऱ्या या मानाजीचा मराठी सत्तेला जसा उपयोग व्हायला पाहिजे होता तसा झाला नाही याबद्दल खरोखर हळहळ वाटते. मानाजी जर नाना फडणिसांच्या वा महादजींच्या सल्ल्याने वागता तर त्याच्या शौर्याचे खचित चीज झाले असते व दत्ताजी–महादजींप्रमाणेच त्याचीही कीर्ति धवल झाली असती.

० ० ०

दा. क्र. ९८४७ दिनांक २३।११।८५
विषय

# घाशीराम कोतवाल

**घा**शीराम कोतवाल हा सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत पुण्याचा कोतवाल होता. इतिहासात त्याचे नाव खलपुरुष म्हणून कायमचे नोंदवले गेले आहे. वस्तुत: या खलपुरुषाच्या अंगी काही चांगले गुण होते व त्याच्या हातून काही चांगली कृत्येही घडली आहेत. पण या पुरुषाने आपल्या आमदानीत असे एक अमानुष कृत्य केले की, त्यामुळे त्याची सर्व सत्कृत्ये विस्मृत झाली व त्याचे नाव कायमचे बदनाम झाले. घाशीरामासंबंधी सन १८६३ मध्ये कादंबरीवजा पुस्तक (मोरोबा कान्होबाकृत) प्रसिद्ध झाले आहे. हे पुस्तक ऐतिहासिक सत्यापेक्षा काल्पनिक मनोरंजक आख्यायिकांनीच भरले आहे. प्रस्तुत लेखात घाशीरामाची उपलब्ध अशी खरीखरी हकीकत दिलेली आहे.

घाशीराम हा मूळचा औरंगाबादचा गौड ब्राह्मण. कित्येकांच्या मते तो उत्तर हिंदुस्थानाकडील कनोजी ब्राह्मण होता. तो ब्राह्मण होता एवढे मात्र खरे. त्याच्या बापाचे नाव सावळदास. घाशीराम नोकरी किंवा व्यापार करण्यासाठी पुण्यात आला. दिसण्यात तो मोठा आकर्षक होता. त्याची बुद्धी तीव्र होती व गोड बोलून दुसऱ्यावर छाप कशी पाडावी ही कला त्याला चांगली अवगत होती. घाशीरामाने आपल्या गुणांच्या जोरावर म्हणा वा कर्तबगारीच्या जोरावर म्हणा, लवकरच नाना फडणिसाची मर्जी संपादन केली. नानाच्या वशिल्याने तो पुण्याचा कोतवाल झाला (१७८१). घाशी-

रामावर नानाची मर्जी बसण्याचे एक कारण असे सांगतात की, घाशीरामाला ललितागौरी नावाची सुस्वरूप कन्या होती व तिजवर नानाची नजर होती. मोरोबा कान्होबाचे पुस्तक व पूना गॅझेटिअरमध्ये यासंबंधी स्पष्ट उल्लेख आढळतो. नाना फडणिसाचा स्त्रीलंपट स्वभाव लक्षात घेता, ही गोष्ट असंभवनीय वाटत नाही. अर्थात् एवढ्याच एका कारणास्तव घाशीरामाला कोतवाली मिळाली हे मात्र खरे नसावे. कोतवालीला घाशीराम लायक होताच. राघोबादादा व नाना यांना तो नानातऱ्हेच्या महत्त्वाच्या वार्ता पुरवीत असे. गुन्हे शोधून काढण्याचे त्याचे कसब नानासारख्या चाणाक्ष कारभाऱ्याच्या लक्षात आले होते. घाशीरामाच्या आधी आनंदराव काशी हा कोतवाल होता. याच्यावरही नानाची मर्जी होती. या आनंदराव काशीची कारकीर्द जुलमी म्हणून गाजली होती. आनंदराव काशी आणि त्याच्या मागून आलेला घाशीराम या दोघांच्या कारकीर्दीबद्दल तत्कालीन नागरिकांचा रोष झालेला होता. लांच खाणे, स्त्रियांना उपद्रव देणे, गुन्हेगारांना क्रूरतेने वागविणे अशासारख्या कृत्यांबद्दल नागरिकांनी त्यांच्याबद्दल अनेक तक्रारी केल्याचे इतिहासात नमूद आहे.

घाशीरामाच्या वेळी कोतवालाला बरेच अधिकार असत. शहरातील निरनिराळ्या फौजदारी व दिवाणी गुन्ह्यांना आळा घालणे, राजकीय हेरांचा फंदफितुरांचा बंदोबस्त ठेवणे व शहराची एकंदर व्यवस्था सुरळीत चालू ठेवणे, अशा तऱ्हेचे हे अधिकार होते. पुण्यात त्या काळी सहा कोतवाल्या होत्या व त्या सर्वांचे वार्षिक उत्पन्न अंदाजे पंचवीस हजार रुपये असे. घाशीराम मुख्य कोतवाल होता. त्याच्या हाताखाली शंभरावर शिपाई (पोलिस) होते. ' दिवट्यांसुद्धा त्याचा सालचा ६२१ रुपये ' पगार होता. याशिवाय त्याचे अवांतर उत्पन्न वेगळे असेच.

घाशीराम सुमारे पंधरा वर्षे पुण्याचा कोतवाल होता. त्याचा अंमल करडा होता. ' नजरबाज ' (गुप्त पोलिस) ठेवून शहरातील फंदफितुरीला त्याने चांगला आळा घातला. सवाई माधवरावाच्या विवाहसमयी त्याने अगदी चोख व्यवस्था ठेवली होती. घाशीरामाच्या कामगिरीवर खूष होऊन नाना फडणिसाने त्याच्या मुलाच्या लग्नात हजारो रुपयांचे दागदागिने व कपडे त्याला नजर केले होते. सन १७७९ च्या ऑक्टोबरमध्ये घाशीरामाने

पुण्यात वावरणाऱ्या इंग्रजांच्या एका हेरास (ठाकोरसिंह) पकडून त्याची जबानी घेतली होती. १७९१ साली त्याच्या अंमलात २३४ गुन्हे घडल्याची नोंद आहे. या एका नोंदीवरून शहरातील गुन्हेगारी त्याने बरीच आटोक्यात आणली होती हे समजून येते. घाशीरामाच्या अमलातील आणखी दोनतीन गोष्टी उल्लेखनीय आहेत. पुण्याच्या पूर्वेस हडपसरच्या रस्त्यावर त्याने एक तळे बांधले व तेथे बाग तयार करविली. भवानी पेठेच्या पूर्वेस 'नवापुरा' नावाची पेठ वसविल्याचाहि उल्लेख त्याच्या नावे आढळतो.

घाशीरामाचा अंत अत्यंत हृदयद्रावकपणे झाला व तो त्याने आपल्या अमानुष कृत्यामुळे ओढवून घेतला. १७९१ च्या ऑगस्ट अखेरीचे दिवस. पेशवे सरकार श्रावणमासात चातुर्मासनिमित्त ब्राह्मणांना लाखो रुपये वाटीत असत. पर्वतीनजीकच्या रमण्यात दक्षिणेचे वाटप होत असे. या दक्षिणेसाठी श्रावणात पुणे शहरात ठिकठिकाणच्या ब्रह्मवृन्दांची एकच गर्दी उडे. इतकी गर्दी की, कोतवालाला त्यांची व्यवस्था ठेवणेही कठीण व्हावे. दक्षिणेसाठी यावेळी दक्षिणेकडील तैलंग ब्राह्मण आले होते. त्यांनी घाशीरामाच्या बागेतील कणसे माळ्याला न विचारता तोडली त्यामुळे माळ्याशी त्यांचा तंटा झाला. या तंट्याची हकीकत घाशीरामाला समजताच त्याने ३४ ब्राह्मणांना पकडले व भवानी पेठेतील स्वतःच्या वाड्यात एका भुयारात त्यांना डांबून टाकले. प्रकरण एवढ्यावर थांबते तर बरे होते; पण घाशीरामाने या ब्राह्मणांना ओळीने तीन दिवस अन्नपाण्यावाचून वाळीत टाकले. या भुयारात हवाही धड येत नव्हती. अशा स्थितीत तिसऱ्या दिवशी त्यातले २१ ब्राह्मण तडफडून मरून जावेत यात नवल काय ? बरे, उरलेल्या अर्धमेलेल्यांना बाहेर काढावे कुणी ? घाशीरामाच्या वाटेला जातो कोण ? आधी घाशीराम, आणि त्यात नाना फडणिसाचा तो प्यारा ! पण याही स्थितीत मानाजी शिंदे फाकडे हा बहाद्दर ब्राह्मणांच्या हाकेला ओ देऊन पुढे झाला. चारपाच साथीदारांच्या मदतीने त्याने भुयाराची दारे फोडली व १३ ब्राह्मणांची कशीबशी सुटका केली.

ब्राह्मणांच्या हत्येची ही वार्ता हा हा म्हणता शहरभर पसरली व सवाई माधवराव पेशव्याप्रत पोचली. खुद्द नाना फडणिसाच्या वाड्यासमोर हजारो ब्राह्मणांनी निदर्शने केली व 'घाशीरामाला शासन करा; 'धरा, मारा'

अशा प्रकारचा त्यांनी एकच गिल्ला केला. आपल्या कृत्याचा परिणाम इतका उग्र होईल याची घाशीरामाला कल्पना नव्हती. तो तत्काळ नाना फडणिसाला भेटला व त्याला आर्जवू लागला की, ‘ हे बदमाष ब्राह्मण रात्री चोऱ्या करीत. म्हणून डांबून ठेवले असता अफू खाऊन ते मेले.’ पण घाशीरामाच्या या मखलाशीचा काहीहि उपयोग झाला नाही. निरपराध ब्राह्मणांची हत्या झाल्याचे कळताच सवाई माधवरावाने घाशीरामाच्या मुसक्या बांधवून त्याला गारद्यांच्या पहाऱ्यात ठेवले व त्याची चौकशी करण्याची आज्ञा वे. अय्याशास्त्री द्रवीड यांना दिली; पण एवढ्याने चेकाळलेल्या ब्राह्मणांचे समाधान झाले नाही. त्यांनी न्यायाधीश अय्याशास्त्री यांचे पागोटे उडविले व त्यांची शालजोडी फाडून टाकली. इतकेच नव्हे तर नाना फडणिसाच्या वाड्याकडे पुन्हा मोर्चा नेला. शेवटी घाशीरामाला उंटाच्या पाठीवर उलटे तोंड करून बांधण्यात आले व त्याला असंतुष्ट ब्राह्मणांच्या स्वाधीन करण्यात आले. या ब्राह्मणांनी मग त्याची रस्त्यारस्त्यातून धिंड काढली, त्याच्या डोक्याचे पाच पाट काढून त्यात शेंदूर थापला व त्या अवस्थेत पुण्याबाहेर मैलभर नेऊन दगडांनी ठेचून ठार मारले. ३१ ऑगस्ट १७९१ रोजी घाशीरामाचा अशा रीतीने अंत झाला. मरणानंतर घाशीरामाच्या प्रेताचे दहन करण्याचीसुद्धा परवानगी मिळाली नाही. त्या प्रेताचे पुढे काय झाले हे फक्त इतिहासाला माहीत. इतिहासात घाशीरामाचे नाव काय ते उरले आहे व तेही बदनाम म्हणून.

घाशीरामाला जीवनराम व सखाराम नावाचे दोन मुलगे होते असे म्हणतात. पण तसा निश्चित पुरावा मिळत नाही. नाही म्हणायला पुणे येथे सेंट मेरीच्या देवळाजवळ घाशीरामाचा एक वाडा उभा होता. पण तोही सांप्रत दिसेनासा झाला आहे. घाशीरामाच्या अमानुष कृत्याचा उल्लेख नाना फडणिसाच्या एका पत्रात पुढीलप्रमाणे आहे : ‘ कोतवालाच्या अपराध-पातकांची पराकाष्ठा जाली. सबब पारिपत्य केले. वरकड मजकूर सर्व लटके. लंबाड व द्वेषी आहेत ते मनस्वी गोष्टी उठवितात.’ यावरून घाशीराम नाना फडणिसाच्या मर्जीतला असला तरी त्याच्या दुष्कृत्यांना नानाचा पाठिंबा नव्हता हे स्पष्ट होते.

० ० ०

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □

# त्रिंबकजी डेंगळे

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □

त्रिंबकजी डेंगळे हा पेशवाईच्या अस्तकालात, म्हणजे दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दीत होऊन गेलेला एक प्रसिद्ध पुरुष होय. हा पुरुष म्हटला तर सुप्रसिद्ध आणि म्हटला तर कुप्रसिद्ध आहे. शालेय इतिहासाच्या पुस्तकात या त्रिंबकजी-विषयी जी थोडीशी माहिती दिलेली आढळते ती अगदीच त्रोटक असल्यामुळे त्याच्या व्यक्तिमत्त्वाची नीटशी कल्पना तिच्यावरून येऊ शकत नाही. जिज्ञासूंसाठी त्याच्याविषयी अधिक तपशीलवार माहिती या लेखात दिली आहे.

त्रिंबकजी डेंगळे हा मूळचा संगमनेर तालुक्यातील निंबगाव जाळीचा. नशीब काढायला म्हणून तो पुण्याला आला आणि दुसऱ्या बाजीरावाच्या पदरी हुजऱ्या म्हणून काम करू लागला. त्रिंबकजीच्या अंगी काही चांगले गुण होते. तो विश्वासू, साहसी व मोठा हिकमती होता. या गुणांच्या जोरावर त्याने लवकरच बाजीरावाची मर्जी संपादन केली व त्याच्या पाठबळावर प्रत्यक्ष इंग्रजांशीही दोन हात केले. त्याची महत्त्वाकांक्षा मोठी होती. नाना खटपटी लटपटी करून त्याने बाजीरावाच्या अंतस्थ कारभारात शिरकाव करून घेतला. पुढे सदाशिव माणकेश्वराला मागे सारून तो स्वतःच बाजीरावाचा कारभारी झाला. बाजीरावसाहेब आधीच चंचल व भित्र्या स्वभावाचे. कुणाला केव्हा जवळ करतील आणि कुणाचा केव्हा काटा

काढतील याचा त्यांच्यापाशी नियम नव्हता. त्रिंबकजी हा वस्तुत: राजकारणात अननुभवी व हडेलहप्पी वृत्तीचा मनुष्य. त्याच्यासारख्याच्या आहारी जाऊन बाजीरावाने स्वतःचे आणि राज्याचे फार नुकसान करून घेतले. बाजीरावाचा खजिना यावेळी रिता पडत चालला होता. पेशवाईचा डोलारा इंग्रजांच्या तैनाती फौजेच्या सहाय्याने बाजीराव कसाबसा सावरून धरीत होता. रेसिडेंट एल्फिन्स्टनची छावणी पुण्याच्या सीमेवर वसली होती. जवळच शिरूरला इंग्रजी फौजेचा तळ पडला होता. पेशव्यांच्या राज्यकारभारात चाणाक्ष मुत्सद्यांची वाण भासत होती. पेशव्यांचा सरदार-जहागिरदारांवरील वचक नाहीसा झाला होता. शाहीर कलावंतिणी यांचा पुण्यात धुडगूस चालू होता. अशा बिकट परिस्थितीत त्रिंबकजीसारखा पुंड कारभारी लाभल्यामुळे पेशवाईवर संकटपरंपरा कोसळावी यात नवल ते काय? त्रिंबकजीने सांगावे आणि बाजीरावाने ऐकावे, अशाच रीतीने जवळजवळ कारभार सुरू झाला.

खजिना भरण्यासाठी बाजीरावाने पटवर्धन, रास्ते, पानसे, इत्यादी मातबर सरदारांच्या सरंजाम्या जप्त केल्या. गणपतराव पानसे यांच्याकडील तोफखान्याचे काम काढून ते त्याने त्रिंबकजीकडे दिले. त्रिंबकजीने फौज वाढविण्याचा सल्ला देताच बाजीरावाने फौज वाढवून ती त्रिंबकजीच्या हवाली केली व त्याला सरदार केले. यामुळे त्रिंबकजी पुढे पुढे अतिशय डोईजड व चढेल झाला. याचे एकच उदाहरण दिले तरी पुरे : त्रिंबकजीने धारवाडचा किल्लेदार बापू शिंदे याच्या तोंडात मारून त्याकडून जबरदस्तीने किल्ला ताब्यात घेतला. दरबारच्या इतर कारभाऱ्यांविषयी त्रिंबकजी बाजीरावाचे कान फुंकी. साताऱ्च्या छत्रपतींवर देखरेख ठेवण्याचे काम बाजीरावाने पुढे त्याच्याकडेच दिले. चतुरसिंग भोसल्याला कपटाने कैद करणारा हा त्रिंबकजीच. त्याच्या उलाढाली एवढ्यावरच थांबत्या तर बरे होते; पण त्याने भलतीच घोडदौड मारली आणि बाजीरावाला इंग्रजांविरुद्ध लढण्यास प्रवृत्त केले.

दरम्यान १८१६ मध्ये गंगाधरशास्त्र्याच्या खुनाचे भीषण प्रकरण उद्भवले. गंगाधरशास्त्री पटवर्धन हा बडोद्याच्या गायकवाड सरकारचा वकील. पेशवे आणि गायकवाड यांच्यात मागील देण्याघेण्याबाबत जो तंटा चालू होता तो

मिटविण्यासाठी गंगाधरशास्त्री पुण्याला आला होता. इंग्रजांचा तो पक्षपाती असल्यामुळे त्याच्या रक्षणाची हमी इंग्रजांनी घ्यावी हे साहजिकच होते. केवळ या शास्त्र्यामुळे गायकवाड आपल्याला दाद देत नाही, अशी बाजीरावाची व त्रिंबकजीची खात्री होऊन चुकली होती. गायकवाडाला नरम आणण्यासाठी गंगाधरशास्त्र्याला तेथून हालविला पाहिजे, किंबहुना त्याचा काटा मुळातच काढून टाकला पाहिजे असेही त्रिंबकजी व बाजीराव यांना वाटू लागले. गंगाधरशास्त्री पुण्याला येताच या दोघांनी त्याच्याशी गोडीगुलाबीचे वर्तन चालू ठेवले. बाजीरावाने त्याला स्वतः दरबारात रहाण्याचेही पाचारण केले. इतकेच नव्हे तर त्रिंबकजीच्या मध्यस्थीने बाजीरावाने आपल्या मेव्हणीचे लग्न शास्त्रींच्या मुलाशी करण्याचा बेत योजला. इंग्रजाला बाजूला ठेवून शास्त्र्यामार्फत गायकवाडावर परस्पर दडपण आणायचे असा त्रिंबकजीने व बाजीरावाने व्यूह रचला होता. नाशिक येथे लग्न होण्याचे ठरले व लग्नाची तयारीही जय्यत सुरू झाली. पण मध्ये माशी कुठे शिंकली कुणास ठाऊक, शास्त्री आणि पेशवे-सरकार यांच्यातील बोलणी फिसकटली आणि शास्त्र्याने लग्नाचा बेत रद्द केला. लग्न रद्द होणे म्हणजे त्रिंबकजीचा अपमान होता व बाजीरावाची दुष्कीर्ति होती. दोघांनी लगेच शास्त्र्याचा काटा काढण्याचे ठरविले.

आषाढी एकादशीनिमित्त बाजीरावाचा मुक्काम पंढरपूरला होता. त्याच वेळी गंगाधरशास्त्रीही यात्रेनिमित्त तेथे गेला होता. पंढरपूरच्या या मुक्कामात त्रिंबकजीकडून शास्त्र्याला दोनतीन वेळा देवळात येण्याचे निमंत्रण देण्यात आले. यावेळी शास्त्र्याची प्रकृती बरी नव्हती. त्याने आपल्याबरोबरची बापू मैराळासारखी माणसे पुण्याला ठेवली होती. पहिल्या दोन निमंत्रणांना त्याने नकार दर्शविला. तिसऱ्या खेपेला मात्र चारपाच इसमांना बरोबर घेऊन शास्त्री रात्रीच्या वेळी देवळात जाण्यास निघाला. देवदर्शन व पूजाअर्चा झाल्यावर त्याने त्रिंबकजीशी थोडा वेळ बोलणे केले व मग मशालीच्या उजेडात तो घरी जाण्यास निघाला. थोड्याच वेळाने देवळातून पाच हत्यारी इसम ‘ रस्ता सोडा, रस्ता सोडा’ असे ओरडत शास्त्र्याच्या रोखाने धावत आले आणि त्यांनी एकाएकी शास्त्र्यावर घाव घालून त्याला खाली पाडले व त्याचे तुकडे तुकडे केले. शास्त्र्याबरोबरची चार पाच माणसे जखमी झाली.

अचानक झालेला हल्ला पाहून त्यांनी कसाबसा पळ काढला. खुनी माणसे देवळाच्या रोखाने पुन्हा पळून गेली. १४ जुलै १८१५ रोजी रात्री हा भीषण प्रकार घडला.

खुनाची वार्ता सर्वत्र लवकरच पसरली. रेसिडेंट एल्फिन्स्टन या वेळी वेरूळ येथे होता. ही वार्ता समजताच त्याने बाजीरावाला लगेच खुनाची चौकशी करण्याची व अपराध्यास शासन करण्याची विनंती केली. गायकवाड सरकार इंग्रजांचे दोस्त आणि गंगाधरशास्त्र्याच्या रक्षणाची इंग्रजांनी हमी घेतलेली. तेव्हा या खुनाचा पूर्ण तलास लावण्याचे इंग्रजांनी ठरविले व बाजीरावाच्या मागे याबाबत सारखा लकडा सुरू केला. खून त्रिंबकजीने करविला याविषयी इंग्रजांची खात्री पटली होती. त्रिंबकजीचे मौन आणि बाजीरावाचे दुर्लक्ष यांमुळे त्याची खात्री आणखी पक्की झाली.

खून होताच त्रिंबकजी व बाजीराव गुपचूप पुण्याला परत आले. त्यानंतर लगेच त्रिंबकजी पुण्याबाहेर पळून गेला. बाजीरावाने त्याला फौज जमवून इंग्रजांविरुद्ध बंड करण्यास प्रवृत्त केले. एल्फिन्स्टनने त्रिंबकजीचा पुडावा लक्षात घेऊन 'त्याला आमच्या ताब्यात द्या.' असा बाजीरावाच्या मागे तगादा चालविला, पण बाजीराव त्याला दाद देईना. उलट त्याने त्रिंबकजीच्या मदतीने इंग्रजांशी लढण्याचा बेत चालविला. इकडे त्रिंबकजी सैन्य उभारीत होता आणि लढण्याची सिद्धता करीत होता. बाजीराव त्याला गुप्तपणे मदत करीत होता. त्रिंबकजीला ताब्यात देण्यासाठी पेशव्यांशी इंग्रजांच्या अनेक दिवस वाटाघाटी चालू होत्या. अखेर एल्फिन्स्टनने बाजीरावाला एक निर्वाणीचे पत्र लिहिले. ते वाचल्यावर मात्र बाजीराव नरमला. १९ सप्टेंबरला कॅ. हिक्ने ८५० शिपायांची तुकडी घेऊन त्रिंबकजीचा बाजीरावाकडून ताबा घेतला व त्याची ठाण्याच्या किल्ल्यात रवानगी केली. भगवंतराव व बंडोजी हे त्रिंबकजीचे दोघे साथीदारही त्याच्याबरोबर किल्ल्यात डांबले गेले.

ठाण्याच्या तुरुंगात त्रिंबकजीच्या पहाऱ्यावर इंग्रज शिपाई होते, पण इंग्रजांच्या हातावर तुरी देऊन त्रिंबकजी एक वर्षाने (१२–९–१८१६) तुरुंगातून पळून गेला. तुरुंगातील इंग्रज शिपायांच्या तैनातीला एक मराठी मोतद्दार होता. हा मोतद्दार पोवाडे, लावण्या म्हणत असे. या कवनांच्या

द्वारे त्रिंबकजीच्या कानी बाजीरावाच्या हस्तकांचे निरोप पोचवले जात. शेवटी याच मोतद्दाराशी संधान बांधून त्रिंबकजीने एका रात्री तुरुंगाच्या भिंतीला भगदाड पाडून पलायन केले. मोतद्दारही त्याच्याबरोबर पळून गेला. पहाटे इंग्रज शिपाई जागे झाले ! पाहातात तो त्रिंबकजी आहे कुठे ?

त्रिंबकजी घोडयावर स्वार होऊन हा हा म्हणता पळाला व नाशिक–खानदेशाकडे त्याने पुन्हा धुमाकूळ मांडला. डोंगरदऱ्यातील भिल्ल, रामोशी मांगांशी त्याने संधान बांधले. पेंढाऱ्यांशी बोलणी केली, व मग दक्षिणेत शंभूमहादेवाच्या डोंगरात येऊन इंग्रजांविरुद्ध दंड थोपटले. बाजीरावाला त्रिंबकजीच्या सुटकेने आनंद झाला. त्याने गुप्तपणे त्रिंबकजीशी संधान बांधले.

त्रिंबकजी बाजीरावाच्या भरंवशावर अधिकाधिक हालचाली करू लागला. पंढरपूर, फलटण, नातेपुते या भागात त्याने सैन्य उभारले. त्याचा उपद्रव व पुडावा इंग्रजांना व सर्वसामान्य जनतेलाही जाचक होऊ लागला. १८१७ च्या फेब्रुवारीत नीरेच्या प्रदेशात त्रिंबकजीने जोराची हालचाल केली. इंग्रजांची आता खात्री होऊन चुकली की, त्रिंबकजीच्या मदतीने आज ना उद्या बाजीराव आपल्यावर हल्ला करणार. हल्ला होण्यापूर्वी आपणच उठाव करणे बरे, हे ध्यानी घेऊन इंग्रजांनी पुण्यालगत सैन्य जमविले व बाजीराव सामोपचाराने वठणीवर येत नाही असे पाहून त्याला निर्वाणीचा खलिता पाठविला की, ' एक महिन्याच्या आत त्रिंबकजीला हवाली करा आणि त्यासाठी जामीन म्हणून रायगड, पुरंदर व सिंहगड हे किल्ले ताब्यात द्या.'

या खलित्याने बाजीराव घाबरला व त्याने त्रिंबकजीला पकडून देण्या-संबंधी जाहीरनामा काढला. या जाहीरनाम्याद्वारे त्रिंबकजीला जिवंत अगर मेलेला पकडून देणारास दोन लक्ष रुपये रोख व एक हजाराचा गाव इनाम मिळणार होता. या जाहीरनाम्याचा अर्थात काहीही उपयोग झाला नाही. इंग्रजी फौजांनी त्रिंबकजीचा चोंहोकडून कोंडमारा चालविला, पण तो बहाद्दर नर्मदा ओलांडून चोलीमहेश्वराकडे निसटून गेला. अनेक दिवस इंग्रज त्याच्या शोधात होते. पण त्याचा ठावठिकाणा काही केल्या लागेना.

पुढे १८१८ च्या जूनमध्ये इंग्रजी सामर्थ्यापुढे खुद्द बाजीरावानेच शरणागती पत्करली. शनिवारवाडयावर युनियन जॅक फडकले आणि पेशवाई

लयाला गेली. बाजीरावाची ब्रह्मावर्ताला स्नानसंध्येसाठी कायमची रवानगी झाली. धन्याचे छत्र नाहीसे झाल्यावर त्रिंबकजी किती दिवस टिकाव धरणार? त्यानेही शरणागति पत्करली. जनरल डोव्हरकडे त्याने अर्जद्वारा जीवदान मागितले. पण इंग्रजांनी त्याची याचना साफ धुडकावून लावली व त्याला कैद करण्यासाठी फौजा पाठविल्या. त्रिंबकजी यावेळी (जुलै १८१८) आपल्या सासुरवाडीस, म्हणजे नाशिक जिल्ह्यातील दिंडोरीजवळ अहिरगाव येथे भूमिगत होऊन बसला होता. त्रिंबकजीचा एक नोकर नाना व कुणी एक स्त्री यांनी बक्षिसाच्या आमिषाने त्रिंबकजीचा पत्ता इंग्रजांना कळविला. कॅ. स्वान्स्टन याने लगेच एक हजार घोडेस्वारांची तुकडी घेऊन अहिरगावची नाकेबंदी केली व त्रिंबकजी दडून बसला होता त्या वाड्याला वेढा दिला. त्रिंबकजीने तेथूनही निसटण्याचा प्रयत्न करून पाहिला. वाड्यातील एका बळदात बुरुजावर जाण्याचा गुप्त जिना होता. या जिन्याची भिंत फोडून निसटण्याच्या तो प्रयत्नात होता. पण इतक्यात इंग्रजांचे सैनिक तेथे आले आणि त्यांनी असहाय्य त्रिंबकजीला कैद करून त्याच्या हाती–पायी बेड्या ठोकल्या. त्रिंबकजीला या वेळी पकडणे इंग्रजांना थोडे महागच पडले! त्रिंबकजीच्या पुरुषवेषातील पत्नीने शत्रूशी झुंज दिली व भाल्याने अनेकांना ठार केले अशी एक आख्यायिका आहे.

कैद झाल्यानंतर त्रिंबकजीला प्रथम चांदवडच्या ठाण्यात ठेवले होते व नंतर गंगेच्या काठी चुनारगडच्या किल्ल्यात त्याची कायमची रवानगी केली गेली. या चुनारगडच्या किल्ल्यात त्रिंबकजी मरेपर्यंत म्हणजे जवळ जवळ दहा वर्षे खितपत पडला होता. त्याला अधूनमधून आपल्या कृत्यांचा पश्चात्ताप होई. एकदा तर त्याने इंग्रजांना लिहून कळविले की, 'मला सोडा, मी बाजीरावसाहेबांप्रमाणे आपली एकनिष्ठेने सेवा करीन.' पण त्याची ही मागणी मान्य करण्याइतके इंग्रज मूर्ख नव्हते. त्यांनी त्रिंबकजीला शेवटपर्यंत कैदच भोगायला लावली. १८२४ साली बिशप हेबर नावाचा इंग्रज प्रवासी चुनारगडला गेला होता. त्याने त्रिंबकजीची मुलाखत घेतली होती. या मुलाखतीचा जो वृत्तांत बिशप हेबरने लिहून ठेवला आहे. त्यावरून पुढील माहिती मिळते—'त्रिंबकजी हा चांगला मजबूत बांध्याचा, ठेंगू व चिडखोर स्वभावाचा होता. त्याला लिहितावाचता येत असे. हिशोबाच्या

कामात तो चोख असे. तुरुंगात असताना भजनपूजनात तो आपला वेळ घालवी. त्याच्या अंगावर एक रेशीमकाठी धोतर अर्धे नेसलेले व अर्धे पांघरलेले असे."

त्रिंबकजीला आठ बायका होत्या व गणपतराव नावाचा एक मुलगा होता. निंबगाव जावळी येथे त्रिंबकजीचे वंशज अद्याप आहेत. इंग्रजांच्या कैदेतील मानखंडना भोगीत त्रिंबकजीने कशीबशी नऊ दहा वर्षे काढली. शेवटी १६ ऑक्टोबर १८२९ रोजी सकाळी ८ वाजता तो निधन पावला. त्रिंबकजीने इंग्रजांशी वेळोवेळी जी झुंज दिली, तीत त्याचे बारा साथीदार होते. त्यांची नावे अशी : बापू गायकवाड, भागोजी, रविराज शिंदे (त्रिंबकजीचा सासरा), तिमाप्पा बोतुरी, महादजीपंत नातेपोतेकर (मामलेदार), गोंधाजी डेंगळे, सयाजी मुळे, आप्पाजी कुरबावीकर, निंबाजी जाधव, महिपतराव डेंगळे, बापू बरडकर आणि दाजी उधळे.

० ० ०

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □

# एल्फिन्स्टनसाहेब

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □

एल्फिन्स्टन––(जुना उच्चार : आल्पिष्टन) साहेबाच्या हस्ते पेशवाईचा अंत झाला. त्यामुळे भारतीय जनतेच्या मनात या गोऱ्या साहेबाविषयी अनादराची भावना असावी हे स्वाभाविक होय. परंतु या कर्तृत्ववान साहेबाच्या ठिकाणी काही विशेष गुण होते. त्याच्या दृष्टीने त्याने आपले कर्तव्य चोख बजावले, इतकेच नव्हे तर, त्याच्या काळात हिंदी जनतेचाही लोभ संपादन करण्यात तो बऱ्याच अंशी यशस्वी झाला होता. मराठ्यांतील बेदिली आणि त्यांच्या कारभारातील अव्यवस्था हे त्याचे एक कारण होय. तो काळ आणि खुद्द एल्फिन्स्टनसाहेब यांच्याविषयी या लेखात दिलेली माहिती मोठी नवलाईची आणि मनोरंजक वाटेल.

माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा पेशवाईअखेर (इ. स. १८११–१७) पुण्याचा रेसिडेंट व नंतर (१८१९–२७) मुंबईचा गव्हर्नर होता.

एल्फिन्स्टनचा जन्म ता. ६ ऑक्टोबर १७७९ रोजी स्कॉटलंडमध्ये एका बडया घराण्यात झाला. त्याचे घराणे लष्करी पेशाचे होते. एल्फिन्स्टनलाही बालपणापासून लष्करी शिक्षणाची आवड होती. शालेय अभ्यासाकडे त्याचे लक्ष कमीच असे; मात्र त्याच्या अंगी ग्रहणशक्ती व चौकसपणा कौतुकास्पद होता. इतिहास, काव्य या विषयाचीही त्याला गोडी होती. एडिंबरो व किंग्जटन् येथे त्याचे शिक्षण कसेबसे पुरे झाले आणि नंतर वयाच्या १५ व्या

वर्षी त्याच्या आयुष्यात एकदम बदल झाला. हिंदुस्थानातील 'ईस्ट इंडिया कंपनी'त त्याचा चुलता डायरेक्टर होता. या चुलत्याने एल्फिन्स्टनला कलकत्त्याला नोकरी लावून दिली. एल्फिन्स्टनने ती हौसेने पत्करली आणि तो जलमार्गाने हिंदुस्थानात येण्यास निघाला. ८ महिन्यांनी २६–२–१७९६ रोजी तो कलकत्त्याला येऊन पोचला व तेथे उमेदवारी करू लागला. पण त्याला ही उमेदवारी फार दिवस करावी लागली नाही. कंपनीने त्याला लवकरच बनारसच्या रेसिडेन्सीत पाठविले.

बनारसला सॅम्युअल डेविस याच्या हाताखाली काम करीत असता एक दिवस त्याच्यावर अचानक एक आपत्ती कोसळली. ती म्हणजे अयोध्येच्या पदच्युत व असंतुष्ट नबाबाने रेसिडेन्सीवर एकाएकी हल्ला केला. या हल्ल्यात इंग्रजांचा चेरी नावाचा अधिकारी मारला गेला. डेविस व एल्फिन्स्टन हे दोघे तेथून शिताफीने पळाले आणि वाचले. पुढे इंग्रजी लष्कराची कुमक आली आणि बनारस शांत झाले. हल्लेखोरांना हुडकून काढून शासन करण्याचे काम एल्फिन्स्टनवर सोपविण्यात आले. त्याने ते काम चोखपणे पार पाडले. या प्रसंगी एल्फिन्स्टनने दाखविलेले धैर्य, अक्कल–हुशारी व न्यायनिष्ठुरपणा वरिष्ठांच्या चांगला नजरेत भरला.

बनारसच्या या यशस्वी कामगिरीनंतर एल्फिन्स्टनची बदली पुण्याच्या रेसिडेन्सीत करण्यात आली. मद्रास, म्हैसूर, हैद्राबाद या लांबच्या मार्गाने जवळजवळ एक वर्षाने एल्फिन्स्टन पुण्याला येऊन पोचला. या प्रवासात असताना जगन्नाथपुरीला त्याला एक फकीर भेटला. त्याने एल्फिन्स्टनला सांगितले, 'तुम्ही लवकरच हिंदुस्थानात राज्य स्थापणार.' कर्मधर्मसंयोगाने फकिराचे हे भविष्य लवकरच खरे झाले. हिंदुस्थानात त्या काळी सर्वांत प्रबळ असणारी मराठी सत्ता म्हणजेच पेशवाई–एल्फिन्स्टनच्या कारकीर्दीतच लयाला जाण्याचा पुढे योग होता.

पुण्याला रेसिडेंट कर्नल क्लोज याच्या हाताखाली एल्फिन्स्टनने राज्य-कारभाराचे धडे घेतले. पुण्यात व महाराष्ट्रात या सुमारास घडणाऱ्या सर्व घटनांकडे त्याचे बारकाईने लक्ष होते. पेशवेदरबाराविषयी त्याचे मत अनुकूल झाले नाही. दुसरा बाजीराव ज्या परिस्थितीत वाढला तिचा त्याने लक्षपूर्वक अभ्यास केला. मराठी, ग्रीक व पर्शियन या भाषाही तो या वेळी

शिकला. पुण्याला एल्फिन्स्टन जवळजवळ तीन वर्षे होता. या अवधीत कितीतरी प्रक्षोभक घटना त्याच्या डोळ्यादेखत घडल्या.

इंग्रजांच्या तैनाती फौजेचे जाळे सर्वत्र पसरत चालले होते. खुद्द बाजीराव या जाळ्यात अडकून पडला होता. शिंदे–भोसले मात्र जाळ्यात सापडले नव्हते. शिंद्यांचे प्रस्थ भलतेच वाढलेले होते. होळकराने आपल्या भावाच्या वधाचा सूड म्हणून पुण्यावर हल्ला केला होता. या हल्ल्याला भिऊन बाजीराव कोकणात इंग्रजांच्या आश्रयाला पळून गेला. बाजीरावाने वसई येथे इंग्रजांशी तह केला आणि तो परत पुण्याला आला. शिंदे–भोसले या तहामुळे रुष्ट झाले. त्यांनी इंग्रजांविरुद्ध उत्तरेकडून उठावणी केली. १८०३ मध्ये उभय पक्षात मोठी लढाई होऊन शिंदे–भोसले शरण आले व त्यांना मोठा प्रदेश गमवावा लागला. वसईच्या लढाईत जनरल वेलस्लीने (ड्यूक ऑफ वेलिंग्टन) मराठ्यांच्या प्रचंड सैन्याचा धुव्वा उडविला. शेवटी उभय पक्षात तह होऊन तात्पुरती शांतता प्रस्थापित झाली. या सर्व उलथापालथीत एल्फिन्स्टनचाही भाग होता. वसईच्या लढाईत वेलिंग्टनबरोबर त्याने रणधुमाळीची मस्ती अनुभवली होती. जनरल क्लोज व वेलिंग्टन यांच्याबरोबर राजकीय वाटाघाटीत तो नेहमी असे. एल्फिन्स्टनच्या रणक्षेत्रावरील हालचाली बघून वेलिंग्टन एकदा म्हणाला, “ हा माणूस राज्यकारभारात पडला नसता तर मोठा सेनानी झाला असता.”

पुण्यात ‘ रावबाजी ’ चांगली रुजल्यानंतर एल्फिन्स्टनची अचानक नागपूरला नेमणूक झाली. तिथे तो ३–४ वर्षे होता. नागपूरच्या त्याच्या मुक्कामात विशेष काही गडबड झाली नाही. त्यानंतर वर्षभर तो कलकत्त्याला रजेवर गेला. तेथे त्याने इंग्रज स्त्री–पुरुषांच्या सहवासात हा काळ मजेत घालविला. मात्र मायदेशी जाण्याची बुद्धी त्याला कधीच झाली नाही. लग्न न केल्यामुळे पत्नी व मुलेबाळे यांचा पाश त्याच्यामागे नव्हताच. अखेरपर्यंत त्याने लग्न केलेच नाही. कलकत्त्याला मुक्कामाला असताना एकदा तो ग्वाल्हेरदरबारी जाऊन आला. त्याला शिकारीचा षोक असे. कदाचित या षोकास्तवच तो ग्वाल्हेरला गेला असावा. १८०८ साली त्याला अफगाणिस्तानमध्ये एका कामगिरीसाठी पाठविण्यात आले. नेपोलियनच्या आक्रमणाला प्रतिबंध करण्यासाठी अफगाणच्या शाहसुजाबरोबर त्याने वाटाघाटी केल्या.

पण या वाटाघाटीतून फारसे काही निष्पन्न न होता त्याला कलकत्त्याला परतावे लागले —— एका महनीय कामगिरीसाठी, चिरंतन कामगिरीसाठी.

ज्या पुण्याला दुय्यम अधिकारी म्हणून तो पूर्वी होता. त्या पुण्याचा रेसिडेंट म्हणून १८११ साली त्याची नेमणूक झाली. यावेळी जलमार्गाने तो प्रथम मुंबईला उतरला व नंतर १८११ च्या मे महिन्यात पुण्याला आला. त्या वेळी पुण्याच्या परिस्थितीत थोडाफार बदल झाला होता. होताहोईतो देशी राजेरजवाड्यांच्या तंट्यात लक्ष घालायचे नाही, घातलेच तर सामोपचाराने त्यांचे तंटे मिटवायचे व नाइलाज झाला तरच सैन्याचा वडगा वापरायचा अशी त्याच्या धोरणाची रूपरेषा होती. पुण्याला आल्यानंतर पहिले आणि महत्त्वाचे असे जे काम त्याला करावे लागले ते म्हणजे बाजीराव आणि जहागिरदार यांच्यातील तंटे मिटविण्याचे. बाजीरावाने स्वतःचा खजिना भरण्यासाठी मातब्बर जहागिरदारांच्या जहागिरी भराभर जप्त करण्याचा धडाका लावला. जहागिरदारांनी एल्फिन्स्टनकडे दाद मागितली व त्याने त्यांच्या जहागिऱ्या पूर्ववत चालू केल्या. जहागिरदारांनी वेळप्रसंगी बाजीरावाला लष्करी व आर्थिक मदत दिली पाहिजे, ही बाजीरावाची अट मात्र त्याने मान्य केली. यानंतर त्याला कोल्हापूरच्या राजाचा बंदोबस्त करावा लागला. दक्षिण भागात पेंढाऱ्यांचा उपद्रव वाढत चालला होता, तोही एल्फिन्स्टनने बंद केला. पेशव्यांविषयी त्याचे मत अनुकूल नव्हते, याचा उल्लेख पूर्वी आलाच आहे. त्याचे मत दिवसेंदिवस दृढतर होत गेले. पेशवा वरून समझोत्याची भूमिका दाखवीत असला तरी अंतर्यामी तो इंग्रजांविरुद्ध जळफळत आहे आणि स्वतःचे सैन्य वाढवीत आहे, हे एल्फिन्स्टनला लवकरच कळून चुकले. मेजर फोर्डच्या मदतीने पेशव्याने कवायती सैन्य उभे केले, आणि त्रिंबकजी डेंगळ्यासारखा हडेलहप्पी मनुष्य राज्याचा कारभारी नेमला. त्रिंबकजीच्या नियुक्तीला एल्फिन्स्टनची अनुकूलता नव्हती. त्रिंबकजीच्या संगतीने पेशवा व बिघडणार आणि इंग्रजांविरुद्ध केव्हा ना केव्हा उठावणी करणार, याची स्पष्ट चिन्हे त्याला दिसू लागली. या सुमारास बडोद्याच्या गायकवाड–सरकारचा वकील गंगाधरशास्त्री पटवर्धन हा पुण्याला वाटाघाटीसाठी आला असता बाजीरावाने आणि त्रिंबकजीने त्याला पंढरपूर येथे नेले व तेथे त्याचा मारेकरी घालून खून

करविला. या खुनाची बातमी एल्फिन्स्टनला वेरूळला कळली. गंगाधरशास्त्र्याच्या रक्षणाची हमी इंग्रजांनी घेतली असल्यामुळे एल्फिन्स्टनने बाजीरावाकडे लगेच खलिता पाठविला आणि अपराध्याम शासन करण्याची विनंती केली. पण बाजीरावाने या गुन्ह्याकडे मुद्दामच दुर्लक्ष केले. इतकेच नव्हे तर त्याने त्रिंबकजीला रोकड व सैन्य देऊन इंग्रजांविरुद्ध बंड करण्यास प्रवृत्त केले. बाजीराव सामोपचाराने ऐकत नाही असे पाहून एल्फिन्स्टनने निर्वाणीचा खलिता पाठविला. त्रिंबकजीला आपल्या ताब्यात देण्याची मागणी केली. अखेर नाईलाजाने बाजीरावाने त्रिंबकजीला इंग्रजांच्या स्वाधीन केले. त्रिंबकजी वर्षभर ठाण्याला कैदेत होता. पण त्यानंतर तेथून तो पळाला व बाजीरावाच्या प्रोत्साहनाने पुन्हा बंड करू लागला. एल्फिन्स्टनची या सर्व गोष्टींवर नजर होतीच. बाजीरावाशी अखेरशी बोलणी केल्यानंतर त्याने कठोर धोरण अवलंबिले. एल्फिन्स्टनच्या हालचाली जाणून बाजीरावही इंग्रजांशी दोन हात करण्यास सिद्ध झाला. १८१७ च्या ऑक्टोबरात बाजीरावाच्या सैन्याच्या हालचाली लक्षात घेऊन एल्फिन्स्टनने इंग्रजी फौजा पुण्याच्या आसमंतात बोलावून घेतल्या.

आता ठिणगी पडायचाच काय तो अवकाश होता. अखेर पेशव्याच्या सैन्याने पाऊल उचलले आणि रेसिडेन्सीवर हल्ला करून ती पेटवून दिली. इंग्रजी सैन्य खडकीला तळ देऊन बसलेच होते. त्या ठिकाणी उभय पक्षात तुंबळ लढाई झाली आणि त्यात बाजीरावाचा पराभव होऊन तो उत्तरेकडे पळून गेला. एल्फिन्स्टनने जनरलच्या मदतीने पुण्याचा ताबा घेतला आणि मराठीत जाहीरनामा काढून शांतता प्रस्थापित केली. अष्टीला बाजीरावाच्या उर्वरित सैन्याने इंग्रजांशी लढाई देऊन पाहिली. पण त्या ठिकाणीही पेशव्यांच्या सैन्याचा पराभव होऊन सेनापती बापू गोखले मारला गेला. अशा रीतीने बाजीरावाचा सर्व मुलूख एल्फिन्स्टनने ताब्यात घेतला आणि कमिशनर या नात्याने सर्व मराठी राज्यावर त्याने इंग्रजी अंमल जारीने सुरू केला.

पुण्याच्या महत्त्वपूर्ण कामगिरीनंतर एल्फिन्स्टनला मुंबईला गव्हर्नर नेमण्यात आले. १८१९ ते १८२७ ऑक्टोबर अखेरपर्यंत तो या पदावर होता. या काळात प्रक्षोभक अशी घटना विशेष घडली नाही. इंग्रजी

राजवटीचा गाडा सुरळीतपणाने चालू करणे एवढेच काम त्याने धडाडीने केले. १ नोव्हेंबर १८२७ रोजी गव्हर्नरपदाची सूत्रे माल्कमच्या हाती सोपवून आणि निरोपसमारंभ, मानपत्रे, पाहुणचार इत्यादींचा उपभोग घेऊन नोव्हेंबरच्या अखेरीस त्याने हिंदुस्थानचा किनारा सोडला. त्याने सतत ३० वर्षे कंपनी सरकारची सेवा केली. इंग्लंडला जाताना वाटेत इजिप्त, सीरिया, आशिया मायनर, ग्रीस, इटली इत्यादी देशांना भेटी देऊन तो इंग्लंडला पोचला.

सेवानिवृत्तीच्या काळात 'हिस्टरी ऑफ इंडिया' या मौलिक ग्रंथाच्या लेखनाशिवाय त्याच्या हातून विशेष अशी महत्त्वाची कामगिरी झाली नाही. त्याच्या जीवनात एक प्रकारची पोकळी निर्माण झाली. प्राय: एकाकी अवस्थेत त्याने उर्वरित आयुष्य घालविले. या काळात ब्रिटिश-सरकारकडून त्याला 'हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल व्हा' म्हणून दोनदा विनंती करण्यात आली होती. त्याने ती नाकारली. वृद्धापकाळी त्याला कमी दिसू लागले व ऐकूही कमी येऊ लागले. २० नोव्हेंबर १८५९ रोजी अर्धांगवायूच्या झटक्याने तो आकस्मितपणे मृत्यु पावला. मृत्युसमयी त्याचे वय ८१ वर्षे होते. मुंबईचे 'एल्फिन्स्टन कॉलेज' म्हणजे ह्या मुत्सद्दी पुरुषाचेच स्मारक होय.

एल्फिन्स्टला ८१ वर्षांच्या आपल्या दीर्घायुष्यात खाजगी जीवन असे जवळजवळ नव्हते. त्याची हिंदुस्थानातील ३० वर्षाची कारकीर्द म्हणजेच त्याचे खरे जीवन. हिंदी लोकजीवन, राजकारण आणि विद्याव्यासंग या क्षेत्रात तो अगदी समरस होऊन गेला होता. उत्तम शील, न्यायनिष्ठुरपणा, धडाडी, दीर्घोद्योग आणि राज्यकारभाराची सामोपचाराची पद्धती यासाठी त्याचे नाव इतिहासात अजरामर झाले आहे. गव्हर्नर असताना शैक्षणिक क्षेत्रातही त्याने अनेक सुधारणा केल्या. त्याच्या विधायक राज्यकाराभारामुळेच तत्कालीन हिंदी लोकांना इंग्रजी राजवट बरी. वाटू लागली होती. एल्फिन्स्टनची योग्यता तत्कालीन प्रवासी बिशप हेबर याने पुढील शब्दात वर्णिली आहे--

" एल्फिन्स्टन हा सर्व दृष्टींनी असामान्य मनुष्य आहे. त्याची बुद्धिमत्ता, वाङ्मयाभिरुचि बहुश्रुतपणा, आचार-विचार आणि कष्टाळूपणा--सर्व काही कौतुकास्पद आहे. तो मोठा समाजप्रिय व रसिक मनुष्य आहे. त्याचे

राजकीय धोरण सूज्ञपणाचे व उदार आहे. शिक्षण आणि सार्वजनिक चळवळीकडे त्याने जितके लक्ष पुरविले, तितके दुसऱ्या कोणाही इंग्रज अधिकाऱ्याने पुरविलेले नाही. एल्फिन्स्टनने लादलेले करही सौम्य स्वरूपाचे आहेत."

इंग्लंडमध्ये एल्फिन्स्टनच्या स्मारकासाठी जो पुतळा उभारला त्याच्या चबुतऱ्यावर पुढील मार्मिक ओळी खोदल्या आहेत.

Member of the Civil Service<br>
Governor of Bombay.<br>
And Historian of early India

० ० ०

# बाळाजीपंत नातू

शनिवारवाड्यावर इंग्रजांचे निशाण लावणाऱ्या बाळाजीपंत नातूची जीवनकथा मोठ्या नवलपूर्ण घडामोडींनी भरलेली व शोकपर्यवसायी आहे. बाळाजीपंत फितूर व राष्ट्रद्रोही असला तरी त्याची संपूर्ण जीवनकथा समजावून घ्यावी अशीच आहे. बाळाजीपंताच्या दुष्कृत्यांची पार्श्वभूमी व त्याचा जीवनक्रम याचा साकल्याने विचार केला म्हणजे त्याच्याविषयी थोडी सहानुभूति वाटू लागते व 'हा बुद्धिमान् व महत्त्वाकांक्षी मनुष्य स्वार्थापायी व धनलोभापायी वाया गेला.' अशी मनाला चुटपूट लागते.

बाळाजी नारायण ऊर्फ बाळाजीपंत नातू हा वाईजवळील पाचवड्चा रहाणारा. लहानपणी त्याच्या घरची स्थिती हलाखीची होती. त्याचे पूर्वायुष्य शागिर्दी व कारकुनी करण्यात गेले. नाइलाज म्हणून तो कारकुनी करीत होता. त्याची महत्त्वाकांक्षा मोठी होती, बुद्धि तल्लख होती व लेखणीचा तो फर्डा होता. भिवाजीपंत हुजरे हसबनीस, साने आदी मातबर जहागिरदारांकडे खर्डेघाशी केल्यानंतर त्याचे अनुभवज्ञान व व्यवहारचातुर्य द्विगुणित झाले. आपल्या गुणांनी त्याने आपल्या धन्यांची मर्जी हा हा म्हणता संपादन केली. बाळाजीपंताच्या अंगच्या सुप्त गुणांची जाणीव सन १७९२ च्या एका शिफारसपत्रात पुढीलप्रमाणे आढळते. 'राजश्री बाळाजीपंत नातू याजला हरकोठे अनास लाविले पाहिजे.' बाळाजीपंत पुण्याला आल्यावर

त्याला लवकरच सरदार खंडेराव रास्ते यांच्याकडे नोकरी मिळाली. रास्ते व पेशवे यांचे संबंध या वेळी चांगले नव्हते. इतकेच नव्हे तर, रास्ते यांनी इंग्रज रेसिडेन्सीशी सूत जमवून आपल्या कामाची दाद लावून घेण्याचा यत्न चालविला होता. बाळाजीपंत हा रास्त्यांचा कारकून. त्याने आपल्या धन्याची कामे रेसिडेन्सीत पायपिटी करून फत्ते केली. बाळाजीपंताच्या या कामगिरीवर रास्ते इतके खूष झाले की मरतेसमयी त्यांनी त्याला आपला मुखत्यार नेमले.

रास्त्यांच्या पश्चात तो इंग्रजांच्या नोकरीत शिरला. सन १८०३ पासून इंग्रजांशी त्याचा संबंध आला. सर बॅरी क्लोज या वेळी पुण्याला रेसिडेंट होता. बाळाजीपंतासारखा हुषार हिंदी नोकर इंग्रजांना हवाच होता. भरपूर पगार देऊन असे कित्येक हिंदी इसम इंग्रजांनी त्या वेळी आपल्याकडे नोकरीला ठेवले व त्यांच्याकडून फितूरी कर्मे करवून घेऊन मराठी सत्तेचा डोलारा उध्वस्त करून टाकला. यशवंतराव घोरपडे व खुश्रूशेठ मोदी हे दोघे फितुरीच्या बाबतीत बाळाजीपंताचेच भाऊबंद होते. रेसिडेंट क्लोज हा बाळाजीपंताच्या कामावर अगदी खूष होता. १८१० साली क्लोज माळव्यात गेला असताना बाळाजीपंतालाही त्याने बरोबर नेले होते. या वेळी बाळाजीपंताच्या दिमतीला पालखी, २५ स्वार व ५० नोकर मंडळी होती. इतकी उत्तम वडदास्त ठेवल्यावर बाळाजीपंतासारखा एके काळचा शागीर्द पेशाचा माणूस वश व्हावा व त्याने आपल्या परकी अन्नदात्याची सेवाचाकरी इमानेइतबारे करावी यात नवल ते काय ?

बॅरी क्लोजनंतर माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनची पुण्याला रेसिडेंट म्हणून नेमणूक झाली. एल्फिन्स्टन हा महाधूर्त व पाताळयंत्री माणूस. त्याने बाळाजीपंताचा भरपूर उपयोग करून घेण्याचे ठरविले व ५०० रु. पगारावर त्याची नेमणूक केली. खुद्द बाजीराव पेशवा बाळाजीपंताला आपल्या नोकरीत बोलावीत होता; पण पंताने पेशवाईपेक्षा ‘कुंपणी सरकारची’ची चाकरी पसंत केली. पंत हा एक प्रकारे इंग्रजांचा पगारी हेर वा हस्तक झाला. तात्कालीन लोक बाळाजीपंताला ‘एल्फिन्स्टनच्या नाकातील बाल’ म्हणून हिणवीत. पेशवे–दरबारात जाऊन इंग्रजांचे निरोप पोचवायचे, मध्यस्थीसंबंधी बोलणी करावयाची व पेश-

त्यांच्या राजकीय हालचालींची वित्तंबातमी इंग्रजांना कळवायची, ही पंताची 'ड्यूटी' ठरली होती. पंताने ही ड्यूटी वा कामगिरी चोख बजावली; इतकेच नव्हे तर स्वतःची अक्कलहुशारी चालवून पेशवे-दरबारातील काही कारकून मंडळीही लाच देऊन फितुर केली व महत्त्वाचे कागदपत्र लांबवले.पंताला या कामगिरीबद्दल इंग्रजांकडून ३०००रुपये मिळाले.

इंग्रजांना खूष करण्यासाठी पंत कायकाय करील याचा नेम उरला नाही. बडोदा-सरकारचे वकील गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचा खून झाला, त्या प्रकरणी पंताने पेशव्यांचा सरदार त्रिंबकजी डेंगळे याच्याविरुद्ध साक्ष द्यावी यात नवल काय ? इंग्रजी लष्करात पेशव्यांनी फितुरी माजविल्याची वार्ता इंग्रजांच्या कानावर घालण्यात पंतच मेण्यात बसून पुढे झाला. त्याची या पुढची मजल म्हणजे, बाजीरावाच्या सैन्याने इंग्रजांवर हल्ला करण्याची जी तयारी केली होती तिचा गौप्यस्फोट करून इंग्रजांना सावध केले आणि या सर्वावर कळस म्हणजे बाजीराव खडकीची लढाई (नोव्हेंबर १८१७) हरल्यानंतर शनिवारवाड्यावर इंग्रजांचे निशाण लावायला पंताचेच हात धजावले.बाजीरावाने पराभूत सैन्यासह पळ काढला. पेशव्यांच्या राजधानीला-पुण्याला-वाली उरला नाही. शहरात घबराट माजली, चोर-दरोडेखोरांचा सुळासुळाट झाला व गडबड माजली. शेठसावकार व सरदारजहागिरदार यांची पाचावर धारण बसली. इंग्रज सेनापति जनरल स्मिथ लुटीच्या उद्देशाने पुण्यावर चाल करून आला. पण या प्रसंगी बाळाजीपंत अचानक पुढे झाला आणि म्हणाला, 'शत्रू तर पळून गेले. आता गरीब रयत लुटण्याचे कारण काय ? ती सगळी त्रासून इंग्रजी अंमल कधी होईल याचीच आशा करीत आहे.' यावर स्मिथ म्हणाला,—'अच्छा ! पण दादा, तुम्ही वाड्यावर आमचे निशाण लावून याल काय ? शहर राखणे असेल तर निशाण लावा.' बाळाजीपंत या वीर (?) कृत्यास तयार झाला. पंचवीस स्वार बरोबर घेऊन रॉबिन्सनबरोबर जाऊन त्याने शनिवारवाड्याचे दरवाजे उघडले व इंग्रजांचे निशाण वाड्यावर लावले. वाड्यात आकाशदिव्याची एक काठी कुठे तरी पडली होती. तिलाच हे अशुभ निशाण अडकविण्यात आले. दुसऱ्या दिवशी शहरात शांतता प्रस्थापित झाली. रॉबिन्सनच्या हाती शहराचा कारभार सोपविण्यात आला व बाळाजीपंताला त्याचा मदतनीस म्हणून

नेमण्यात आले. १८१७ च्या एका पत्रात या घटनेसंबंधी पुढील उल्लेख आढळतो : 'सेहरातील बंदोबस्तास हाजार–बाराशे मणुश, बाळाजीपंत नातू याचे विदेमाणे ठेवून शेहराचा बंदोवस्त केला.'

बाळाजीपंताने शनिवारवाड्यावर इंग्रजांचे निशाण लावण्याचे जे स्वराज्य-द्रोही वर्तन केले, ते इंग्रजांच्या भीतीमुळे केले, की पुण्याची लुटालूट थांबविण्याच्या हेतूने हे स्पष्टपणे कळत नाही. त्याच्या या दुष्कृत्यामुळे पुण्याची लूट टळली हे मात्र खरे. त्याने निशाण लावले नसते तर अन्य कोणी ते लावलेच असते. कारण इंग्रजांना प्रतिबंध करायला त्यावेळी कोणता मायेचा पूत समोर येणार होता ?

बाळाजीपंताने इंग्रज––सरकारची इमानेइतबारे जी चाकरी केली तीबद्दल त्याला 'पाच गावच्या सनदा' कंपनी सरकारमार्फत मिळाल्या. एल्फिन्स्टनला लिहिलेल्या कृतज्ञतेच्या एका पत्रात तो लिहितो : 'दरिविला मेहेरबा पाटींजरसाहेब व राबीसनसाहेब यांणी पाच गावच्या सनदा फिदवीचे नावे तयार करून त्या पाठविल्या त्या पावोन बहुत संतोष जाहला. शेवकाकडून इतकी खिजमत जाहली नसता इनाम बहुत मिळाले.'

खुद्द एल्फिन्स्टनने गव्हर्नर जनरलला पंताविषयी पुढील शिफारस केली होती. . 'आपण देत असलेल्या पैशाचे तो योग्य चीज करीत आहे.' एकंदरीने कंपनी सरकारचे राज्य सुरू झाल्यावर पंताला चांगले दिवस आले. त्याने लवकरच आपल्या मुलीचे लग्न काढले. लग्नासारख्या घरातील खाजगी गोष्टीही एल्फिन्स्टनसाहेबाला कळविल्यावाचून तो रहात नाही. बाळाजीपंत-दादाने आपल्या साहेबास या लग्नाबाबत जे नमुनेदार पत्र लिहिले, ते उल्लेखनीय आहे :–– 'साहेबाला मुतालिक अलीशान हनराबल मौंट इष्टवारीट इलफिसतनसाहेब बाहादूर सलामत––दरीविला मुलीचे लग्न करावयाचे, त्यास साहेबास अर्ज करून व्हावे ही इच्छा. परंतु साहेबाचे कदमापासून दूर राहाणे जाहाले...वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नीळकंठशास्त्री थत्ते यांचा पुत्र वर निश्चित करून वैशाख वद्य पंचमीस लग्नतिथीचा निश्चय केला आहे. साहेबाचे कदम मुबारख होऊन कार्य सिद्धीस जाइते जाहाले पाहिजे. लोखंड परसास लागल्यावर सोने होईल की नाही ही काळजी लोखंडास राहात नाही.' (११–५–१८१८)

त्यांच्या राजकीय हालचालींची वित्तंवातमी इंग्रजांना कळवायची, ही पंताची 'ड्यूटी' ठरली होती. पंताने ही ड्यूटी वा कामगिरी चोख बजावली; इतकेच नव्हे तर स्वत:ची अक्कलहुशारी चालवून पेशवे-दर-बारातील काही कारकून मंडळीही लाच देऊन फितुर केली व महत्त्वाचे कागदपत्र लांबवले.पंताला या कामगिरीबद्दल इंग्रजांकडून ३०००रुपये मिळाले.

इंग्रजांना खूष करण्यासाठी पंत कायकाय करील याचा नेम उरला नाही. वडोदा-सरकारचे वकील गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचा खून झाला, त्या प्रकरणी पंताने पेशव्यांचा सरदार त्रिबकजी डेंगळे याच्याविरुद्ध साक्ष द्यावी यात नवल काय? इंग्रजी लष्करात पेशव्यांनी फितुरी माजविल्याची वार्ता इंग्रजांच्या कानावर घालण्यात पंतच मेण्यात वसून पुढे झाला. त्याची या पुढची मजल म्हणजे, बाजीरावाच्या सैन्याने इंग्रजांवर हल्ला करण्याची जी तयारी केली होती तिचा गौप्यस्फोट करून इंग्रजांना सावध केले आणि या सर्वांवर कळस म्हणजे बाजीराव खडकीची लढाई (नोव्हेंबर १८१७) हरल्यानंतर शनिवारवाड्यावर इंग्रजांचे निशाण लावायला पंताचेच हात धजावले.बाजीरावाने पराभूत सैन्यासह पळ काढला. पेशव्यांच्या राजधानीला-पुण्याला-वाली उरला नाही. शहरात घबराट माजली, चोर-दरोडेखोरांचा सुळासुळाट झाला व गडबड माजली. शेठसावकार व सरदारजहागिरदार यांची पाचावर धारण बसली. इंग्रज सेनापति जनरल स्मिथ लुटीच्या उद्देशाने पुण्यावर चाल करून आला. पण या प्रसंगी बाळाजीपंत अचानक पुढे झाला आणि म्हणाला, 'शत्रू तर पळून गेले. आता गरीब रयत लुटण्याचे कारण काय? ती सगळी त्रासून इंग्रजी अंमल कधी होईल याचीच आशा करीत आहे.' यावर स्मिथ म्हणाला,—'अच्छा! पण दादा, तुम्ही वाड्यावर आमचे निशाण लावून याल काय? शहर राखणे असेल तर निशाण लावा.' बाळाजीपंत या वीर (?) कृत्यास तयार झाला. पंचवीस स्वार बरोबर घेऊन रॉबिन्सनबरोबर जाऊन त्याने शनिवारवाड्याचे दरवाजे उघडले व इंग्रजांचे निशाण वाड्यावर लावले. वाड्यात आकाशदिव्याची एक काठी कुठे तरी पडली होती. तिलाच हे अशुभ निशाण अडकविण्यात आले. दुसऱ्या दिवशी शहरात शांतता प्रस्थापित झाली. रॉबिन्सनच्या हाती शहराचा कारभार सोपविण्यात आला व बाळाजीपंताला त्याचा मदतनीस म्हणून

नेमण्यात आले. १८१७ च्या एका पत्रात या घटनेसंबंधी पुढील उल्लेख आढळतो : ‘ सेहरातील बंदोबस्तास हाजार–बाराशे मणुश, बाळाजीपंत नातू याचे विदेमाणे ठेवून शेहराचा बंदोवस्त केला.’

बाळाजीपंताने शनिवारवाड्यावर इंग्रजांचे निशाण लावण्याचे जे स्वराज्य-द्रोही वर्तन केले, ते इंग्रजांच्या भीतीमुळे केले, की पुण्याची लुटालूट थांबविण्याच्या हेतूने हे स्पष्टपणे कळत नाही. त्याच्या या दुष्कृत्यामुळे पुण्याची लूट टळली हे मात्र खरे. त्याने निशाण लावले नसते तर अन्य कोणी ते लावलेच असते. कारण इंग्रजांना प्रतिबंध करायला त्यावेळी कोणता मायेचा पूत समोर येणार होता ?

बाळाजीपंताने इंग्रज––सरकारची इमानेइतबारे जी चाकरी केली तीबद्दल त्याला ‘ पाच गावच्या सनदा ’ कंपनी सरकारमार्फत मिळाल्या. एल्फिन्स्टनला लिहिलेल्या कृतज्ञतेच्या एका पत्रात तो लिहितो : ‘ दरिविला मेहेरवा पाटींजरसाहेब व रावीसनसाहेब यांणी पाच गावच्या सनदा फिदवीचे नावे तयार करून त्या पाठविल्या त्या पावोन वहुत संतोष जाहला. शेवकाकडून इतकी खिजमत जाहली नसता इनाम वहुत मिळाले.’

खुद्द एल्फिन्स्टनने गव्हर्नर जनरलला पंताविषयी पुढील शिफारस केली होती. : ‘ आपण देत असलेल्या पैशाचे तो योग्य चीज करीत आहे.’ एकंदरीने कंपनी सरकारचे राज्य सुरू झाल्यावर पंताला चांगले दिवस आले. त्याने लवकरच आपल्या मुलीचे लग्न काढले. लग्नासारख्या घरातील खाजगी गोष्टीही एल्फिन्स्टनसाहेबाला कळविल्यावाचून तो रहात नाही. बाळाजीपंत-दादाने आपल्या साहेबास या लग्नाबावत जे नमुनेदार पत्र लिहिले, ते उल्लेखनीय आहे :–– ‘ साहेबाला मुतालिक अलीशान हनराबल मौंट इष्टवारीट इलफिसतनसाहेब बाहादूर सलामत––दरीविला मुलीचे लग्न करावयाचे, त्यास साहेबास अर्ज करून व्हावे ही इच्छा. परंतु साहेबाचे कदमापासून दूर राहाणे जाहाले...वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री नीळकंठशास्त्री थत्ते यांचा पुत्र वर निश्चित करून वैशाख वद्य पंचमीस लग्नतिथीचा निश्चय केला आहे. साहेबाचे कदम मुबारख होऊन कार्य सिद्धीस जाइते जाहाले पाहिजे. लोखंड परसास लागल्यावर सोने होईल की नाही ही काळजी लोखंडास राहात नाही.’ (११–५–१८१८)

इंग्रजसरकारची चाकरी पंत किती निष्ठेने करीत होता याचे प्रत्यंतर आणखी एका पत्रात सापडते. नीळकंठ आवा पुरंदरे यांना किल्ला खाली करून देण्याबावत २१–५–१८१८ रोजी तो लिहितो,––' साहेबांचे मनात कोण्हास उपद्रव करावा असे नाही. काळजी करू नये. किला हवाली करण्यास येक घटकेचा विलंब न करिता खाली उतरोन हवाली करून द्यावा. म्हणजे साहेबाची मर्जीचा बहुत संतोष होईल. याणे पुढे तुम्हासच उपयोग आहे.' यानंतर बाळाजीपंताने इंग्रजांमार्फत साताराच्या छत्रपतीच्या दरबारी प्रवेश करून घेतला आणि तेथेही स्वराज्य बुडविण्याच्या कारस्थानात तो सामील झाला.

पेशवाईचा धनी बाजीराव उत्तरेकडे पळाला व त्याने जून १८१८ मध्ये शरणागती पत्करली. साताराचे प्रतापसिंह राजे या घटनेमुळे एकप्रकारे मुक्त झाले व इंग्रजांच्या कृपेने स्वतंत्र कारभार करू लागले. १८१८ साली कॅ. जेम्स ग्रँट (डफ) याची सातारा येथे रेसिडेंट म्हणून नेमणूक करण्यात आली. त्याच्या हाताखाली बाळाजीपंत नातूला दरमहा ५०० रु. पगारावर मदतनीस म्हणून नेमण्यात आले. साताराच्या कारभारात प्रवेश झाल्यामुळे बाळाजीपंताला भलताच भाव आला. खुद्द महाराजांवर त्याने दाव ठेवण्याचा यत्न चालवला. महाराजांनी आपल्याला दिवाण करावे अशी त्याची आकांक्षा होती; पण महाराजांनी या बावतीत पंताची डाळ शिजू दिली नाही व त्याच्या लुडबुडीकडे लक्ष न देता स्वतंत्रपणे राज्यकारभार सुरू केला. पंत यामुळे रुष्ट झाला. महाराजांशी त्याने एक प्रकारे वैर आरंभिले. ग्रँट व एल्फिन्स्टन यांच्या कानाशी लागून त्याने महाराजांविषयी गैरसमज पसरविण्यास आरंभ केला. 'कुंपणी सरकारच्या रेसिदेंताचा मी असिस्टंट आहे.' अशी प्रौढी मिरवून महाराजांच्या कारभारात वारंवार ढवळाढवळ करू लागला. कॅ. ग्रँटला इतिहासलेखनासाठी महाराजांची कागदपत्रे हवी होती, ती देण्यासाठी बाळाजीपंताने महाराजांवर खूप दाब आणला. इतिहास-लेखनाच्या कामी त्याने स्वत: ग्रँटला भरपूर सहाय्य केले. यानंतर पेशव्यांच्या गादीप्रमाणे छत्रपतींची गादी नाहीशी करण्यास इंग्रजांना त्याने उघड उघडपणे मदत केली. बाळाजीपंताच्या साहाय्याने महाराजांवर काही तरी किटाळ आणून शेवटी इंग्रजांनी त्यांना पदच्युत केले व त्यांची काशीला

रवानगी करून त्यांना आजन्म नजरकैद भोगायला लावली. महाराजांचा एकनिष्ठ वकील रंगो बापूजी याने इंग्लंडला जाऊन महाराजांवरील अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला; पण बाळाजीपंतासारख्या कुटिल व्यक्तीच्या कारस्थानामुळे रंगो बापूजीचे यत्न लटके पडले व बिचाऱ्याला हात हालवीत परत यावे लागले. प्रतापसिंहाला बाळाजीपंताने कसकसे छळले याची समग्र हकीकत मेजर बसू यांच्या इंग्रजी ग्रंथात दिलेली आहे.

प्रतापसिंहाच्या पदच्युतीनंतर त्याचा नालायक भाऊ अप्पासाहेब याला इंग्रजांनी राज्याभिषेक करविला. अप्पासाहेबाच्या कारकीर्दीत मात्र बाळाजीपंताचे दिवाणगिरीचे स्वप्न सफल झाले. तो साताऱ्याचा दिवाण झाला. राज्याभिषेकासमयी त्याने स्वत:ला व स्वत:च्या जावयाला सनईचौघड्याचा मान मिळविला. पण ही दिवाणगिरी फार काळ भोगण्याचे त्याच्या नशिबी नव्हते. बाळाजीपंताच्या जाचक कारभाराचा वीट येऊन, शेवटी (१८४८) अप्पासाहेबानेच त्याला बडतर्फ केले. पंतावर लांच खाल्ल्याचे आरोप अनेक होते व त्याचा पार्लमेंटपर्यंत गवगवा झालेला होता. प्रतापसिंहाच्या कारकीर्दीत ब्राह्मणवर्गाचे पुढारीपण स्वीकारून पंताने स्वजातीयांचे तेवढे हित साधण्याची जी कारस्थाने केली तीही शेवटी त्याच्या आंगलट आली. आपण दिवाण, म्हणजे महाराजांचे नोकर आहोत, या भूमिकेचा पंताला विसर पडला. महाराजांनी आपल्या तंत्राने कारभार केला पाहिजे असा अट्टाहास धरल्यामुळे महाराजांच्या व सर्वसामान्य जनतेच्या मर्जीतून पंत साफ उतरला व शेवटी खाली मान घालून सातारा त्याला सोडावे लागले. साताऱ्याला असताना पंताचे चहाते विशेष करून ब्राह्मण होते. पंताच्या औदार्याचे व धार्मिक स्वभावाचे त्या काळी काही कीर्तनकार गोडवे गात असत.

पंत बुद्धिमान खरा पण ती बुद्धी वक्र होती. आयुष्याच्या शेवटी तो सर्वसाधारण समाजात फार अप्रिय झाला. इंग्रजही त्याला विचारीनासे झाले. पुढे पंताला आपल्या कृत्यांचा पश्चात्ताप होऊ लागला. नोकरी व्यतिरिक्त लांच, अपहार यांच्याद्वारे त्याने लाखो रुपयांची इस्टेट कमावली होती; पण अखेर तिच्याकडे पाठ फिरवून तो काशीला निघून गेला. काशीच्या वास्तव्यात स्वारीने देवधर्म करून उर्वरित आयुष्याचे सोने केले

असते तर काय बिघडले असते ? पण नाही. त्याचा कारस्थानी व चळवळ्या स्वभाव काही केल्या जाईना. काशीत प्रतापसिंहाच्या राणीला भेटून त्याने तिला इंग्रजांना शरण जाण्याचा सल्ला दिला. राणीनेही अगतिक होऊन रेसिडेंटाला राजीनामा लिहून दिला. तिकडे हजारो मैलांवर खुद्द इंग्लंडमध्ये रंगो बापूजीसारखा स्वाभिमानी चाकर महाराजांना राज्यावर आणण्यासाठी जिवाचे रान करीत होता आणि इकडे पंतासारखा स्वजन ते राज्य उलथून टाकण्याची कारस्थाने रचत होता ! किती विचित्र दृश्य आणि निंद्य कर्म ! आणि हा सारा आटापिटा कशासाठी ?——तर स्वार्थासाठी, धनलाभासाठी! पंताने लाखो रुपयांची इस्टेट कमावली; पण नाव घालवले, कायमचे बदनाम करून घेतले !

पंत मूळचा बुद्धिमान्, महत्त्वाकांक्षी व धडपड्या माणूस. व्यवहारदक्ष व हिशेबी, चाणाक्ष आणि धोरणी; पण व्यक्तिगत स्वार्थ व धनलोभ या दुर्गुणांपायी त्याचे हे गुण निष्प्रभ झाले. त्याने हजारो रुपयांचा केलेला दानधर्मसुद्धा वाया गेला. कारण त्याची धार्मिक बुद्धी संकुचित होती. आपल्या अधिकारात त्याने जी धर्मकृत्ये केली तिचे मूळ भूतदया हे नव्हते तर स्वजनहित हे होते. पेशवाईशी व साताऱ्च्या छत्रपतींशी बेइमानी करण्याचे जे महत्पाप त्याने केले त्यामुळे त्याचे नाव राष्ट्रद्रोह्यांच्या मालिकेत कायमचे गोवले गेले.

पंताविषयी एक आख्यायिका व एक अभिप्राय उद्धृत करण्यासारखा आहे. त्यावरून पंताची खरी योग्यता कळून येते. गव्हर्नर सर जॉन मालकम्ने पंताला एकदा विचारले, ‘ तुमची राज्यं पाठोपाठ पडली याचं कारण काय ?’ पंत उद्गारला, ‘ आमची राज्यं व्यष्टीचे स्वाधीन म्हणजे एक पुरुषाच्या स्वाधीन आहेत. तेव्हा तो पुरुष कधी चांगला निघतो, तर कधी वाईट निघतो. आणि वाईट निघाला म्हणजे राज्य घालवितो...तुमचे राज्य समष्टी आहे. त्यात शहाण्या व शूर पुरुषांची अखंड धारा चालते व त्यामुळे त्यास अशक्तता येत नाही.’ या मार्मिक उत्तरावर गव्हर्नर अगदी खूष झाला.

‘ स्टोरी ऑफ सातारा ’ (बसू) या ग्रंथात पंताचे गुणावगुण पुढील शब्दात सांगितले आहेत——

'The Second of the Raja's enemies was Ballajipant Natu. This Person, a leading and bigoted Brahmin, of great talent and art, cunning, ambitious and worldly minded, was possessed of considerable influence with all the British authorities in the Deccan.'

मोठमोठ्या इंग्रज साहेबांना अशा रीतीने झुलवणारा हा बाळाजीपंत काशी येथे २४–६–१८५० रोजी वारला. मरणापूर्वी त्याने संन्यास घेतला होता. त्याला तीन पुत्र व दोन कन्या होत्या. त्याचे घरगुती नाव 'दादा' होते. तो गोरागोमटा, उंच व धष्टपुष्ट होता. त्याची रहाणी नियमित व वृत्ती धार्मिक होती. एल्फिन्स्टनसारख्या बड्या इंग्रज अधिकाऱ्याकडून त्याने अनेक शिफारसपत्रे संपादन केली होती. सांप्रत त्याचे वंशज पुणे येथे आहेत. पंताच्या निधनावर भाष्य करताना श्री. केशवराव ठाकरे यांनी आपल्या ग्रंथात जळजळीत उद्गार काढले आहेत :— 'तो कशाने मेला हे नीटसे उमगत नाही. पण हृदयक्रिया बंद पडून मरणे शक्यच नव्हते. त्या आंग्लभगताला हृदयच मुळी नव्हते, तर त्याची क्रिया बंद पडणार कशी ! प्रतापसिंहाच्या राज्याला मायबाप कंपनी सरकारच्या घशात सुखरूप कोंबलेले पाहूनच बिचाऱ्याची प्राणज्योत मावळली.'

शाखा.
ग्रं. नं.
वा. क्र. 9/860 दिनांक 23/7/7
विषय

# इभ्रामखान गारदी

मराठ्यांच्या इतिहासात तीन गारदी गाजले, इभ्रामखान, सुमेरसिंग, आणि खरकसिंग गारदी. हे गारदी ज्याची चाकरी एकदा पत्करतील त्याच्याशी इमान राखतील. संकटप्रसंगी जिवाला जीव देतील. वरील तीन गारद्यांपैकी सुमेरसिंग—खरकसिंग हे नारायणराव पेशव्यांचे खुनी म्हणून कुप्रसिद्ध आहेत. इभ्रामखान त्यांच्या अगोदरच्या काळातला, म्हणजे नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दीतला. त्याने मराठ्यांच्या राज्यासाठी मर्दुमकी गाजविली आणि आपले नाव उज्ज्वल केले.

इभ्रामखानाच्या पूर्वायुष्याची जी माहिती मिळते ती अशी — प्रथम तो फ्रेंच सेनापती बुसी याच्या हाताखाली साधा शिपाई होता. तोफखान्याच्या पथकात त्याला कामगिरी मिळाली होती. त्याची शरीरयष्टी किरकोळ होती, वर्ण काळा होता. व तोंडावर देवीचे वण असल्यामुळे तो कुरूपही दिसे. पण असे असले तरी शौर्यधैर्यादी गुणात तो इतरांना मागे सारी. आपल्या कर्तबगारीच्या जोरावर लवकरच तो अंमलदार झाला. तोफा उडविण्याचे कसब त्याने चांगले आत्मसात् केले. पुढे काही कारणामुळे बुसीचे आणि त्याचे भांडण झाले व तो वऱ्हाडात निजामअल्लीकडे नोकरीस राहिला. यावेळी त्याच्याजवळ पंचवीस तोफा व अडीच हजार गारदी यांचे पथक होते. निजामअल्ली त्याला दरमहा एक लाख रुपये तनखा देत असे.

तोफखान्याचे हे एक नवे युद्धतंत्र इंग्रज–फ्रेंचादी परकीयांनी त्या वेळी हिंदुस्थानात आणले होते व त्या तंत्राचा प्रभाव युद्धप्रसंगी उभय पक्षांना चांगला कळून आला होता. इभ्रानखानाने बुसीच्या हाताखाली तोफखान्याचे शिक्षण घेतलेले असल्यामुळे त्याचा एकप्रकारे दरारा उत्पन्न झाला होता. व म्हणूनच मोठा तनखा देऊन निजामअल्लीने त्याला आपल्याकडे ठेवून घेतले होते. पेशवे आणि निजाम यांच्यात शिदखेडची जी लढाई झाली तीत निजामाच्या बाजूने इभ्रामखान लढला होता. पुढे हाच इभ्रानखान, निजाम-अल्लीने कामावरून दूर करताच, उदगीरच्या लढाईत (१७५८) पेशव्यांच्या बाजूने निजामाशी लढला. या लढाईत त्याने सदाशिवरावभाऊची मर्जी संपादन केली. निजामअल्लीशी इभ्रामखानाचा बेबनाव होताच सदाशिवराव-भाऊने केशवराव पानश्यांमार्फत त्याच्याशी बोलणी केली व त्याला आपल्या नोकरीत घेतले. भाऊच्या या कृतीमुळे इभ्रामखानाचा एक प्रतिस्पर्धी आप्त मुजफरखान हा अतिशय चिडला व सूडाने प्रेरित होऊन त्याने भाऊसाहेबावर मारेकरी घातले. सुदैवाने संरक्षकांनी भाऊला या आपत्तीतून वाचविले. मुजफरखान व त्याचा जावई हैदरखान यांना या कामी पकडण्यात आले व त्यांचा शिरच्छेद करण्यात आला. इभ्रामखान आपल्या तोफा व गारदी यांचे पथक घेऊन पेशव्यांच्या पदरी मानाने राहू लागला.

उदगीरच्या लढाईतील विजयानंद मराठी फौज लुटते न लुटते तोच उत्तरेकडून अबदालीच्या आक्रमणाच्या वार्ता थडकल्या व दत्ताजी शिंद्याच्या अमानुष वधाची भीषण हकीकत सर्वांच्या कानी आली. पटदुऱ्याला नाना-साहेब पेशवे आणि त्यांचे चुलतबंधु सदाशिवरावभाऊ मोगली आक्रमणाचा कायमचा बंदोबस्त कसा करावा या विवंचनेत निमग्न झाले होते. शेवटी वाटाघाटीतून असे निष्पन्न झाले की, ‘ सदाशिवरावभाऊने तीसचाळीस हजार फौज घेऊन अबदालीचा पाडाव करावा व त्याला अटकेपार पिटाळून लावावे.’ अबदालीसारख्या मातलेल्या व कसलेल्या हत्तीशी झुंज घेण्याला भाऊइतका योग्य पुरुष त्यावेळी दुसरा नव्हता.

१८ मार्च १७६० रोजी भाऊसाहेब पेशवा प्रचंड सैन्य घेऊन सिदखेडाहून निघाला. त्याच्याबरोबर सोळा वर्षांचा विश्वासरावही निघाला. इभ्रामखान गारद्याचा तोफखाना व त्याची दहा हजार कवायती फौज यावर भाऊ-

साहेबाची फार भिस्त होती. अर्थात् त्यालाही भाऊने बरोबर घेतले. मराठा सैन्याची नेहमीची रीत गनिमी काव्याने लढण्याची; पण यावेळी उत्तरेकडच्या अपरिचित प्रांतात व त्यातही अबदालीसारख्या बलाढ्य सरदाराशी गाठ असल्याने ही गनिमी काव्याची पद्धत कितपत उपयोगी पडते याची इभ्राम-खानाला चिंता पडली. मराठे जर मध्येच पळू लागले तर आपल्या अवजड तोफखान्याचे काय होणार ही शंका त्याला वाटेत भेडसावू लागली. शेवटी हिय्या करून, अदबीने तो भाऊसाहेबांस म्हणाला, "तुम्ही गलीम लोक दाखवाल आणि पळाल. आम्ही गारदी लोक केवळ पायउतार. आम्हास पळावयास पाय नाहीत, आणि गाठ तो दुराणी रोहिल्यांशी पडणार. याची आज्ञा काय?" त्याची ही शंका भाऊसाहेबाने तत्काळ निवारण केली. "निदानीचा प्रसंग पडला तरी तुम्हास सोडून निघणार नाही. जेथे तुम्ही गाडून उभे राहाल तेथे मी राहीन. यास अंतर करणार नाही!" असे आश्वासन देऊन भाऊसाहेबाने त्याला बेलभंडार दिले व त्याजपासून साजकरोटी घेतली.

मराठ्यांची प्रचंड सेना नर्मदा ओलांडून ग्वाल्हेर, मथुरा, आग्रा इत्यादी मुक्काम मागे टाकून दिल्लीच्या परिसरात येऊन थडकली. दिल्लीचा बचाव याकूबखान शिकस्तीने करू लागला. भाऊची आज्ञा सुटताच शिंदे, होळकर व बळवंतराव मेहेंदळे किल्ल्यावर तुटून पडले. तटाजवळील खंदकांवर मोर्चे लावून इभ्रामखानाने तीन तोफांचा मारा सुरू केला. बुरुज ढासळू लागले. मराठ्यांनी खिडारातून घोडे आत घातले. 'तोबा तोबा' करीत शत्रू पळून गेला. विश्वासरावाला बरोबर घेऊन भाऊसाहेबाने किल्ल्यात प्रवेश केला. इभ्रामखान, मल्हारराव होळकर, जनकोजी शिंदे, दमाजी गायकवाड, यशवंतराव पवार, समशेरबहाद्दर आदि वीरांनी श्रीमंतांच्या पाठोपाठ किल्ल्यात प्रवेश करून मुजरे केले व सारी फौज आनंदोत्सवात निमग्न झाली. अबदालीच्या दृष्टीने हा प्रकार नामुष्कीचा होता. पण त्याला तो उघड्या डोळ्यांनी पहावा लागला. इभ्रामखानाच्या तोफखान्याची करामत पाहून अबदालीने हायच खाल्ली!

दिल्लीचा दोन महिन्यांचा मुक्काम आटोपून मराठी सेना आता कुंजपुऱ्याकडे निघाली. अबदालीला शह देण्यासाठी व त्याची नाकेबंदी करण्यासाठी कुंजपुरा हस्तगत करणे प्राप्त होते. अबदालीची रसद पोचण्यापूर्वीच भाऊसाहेबाने

आज्ञा केली की, ‘ तीन टोळया करून किल्ल्यावर हल्ला करा.’ अल्पावकाशात सर्व सिद्धता झाली. एका बाजूने दमाजी व दुसऱ्या बाजूने इभ्रामखान व समशेरअल्ली आणि तिसऱ्या बाजूने बळवंतराव असा व्यूह रचला गेला व हल्ल्यास तोंड लागले. दोन घटकापर्यंत मारामारी झाली. ‘ हरहर महादेव’ च्या गर्जना उठल्या. मोठी धुंदी झाली. पाचसात हजार मुडदे पडले. खानाच्या तोफांनी कमाल केली. किल्ल्यास भगदाडे पडली. फौज आत शिरली. दत्ताजीचे शीर कापून नेणारा कुतुबशहा व सैदखान दमाजीच्या हाती सापडले. किल्ल्यात अमाप लूट मिळाली. कुतुबशहा व सैदखान यांचा भाऊसाहेबाने क्रोधाने शिरच्छेद करविला.

मराठी फौजेला आता नवा जोम आला. नोव्हेंबर महिन्यात पानपताजवळ छावणी पडली. अबदालीनेही नवी कुमक मागवून जंगी तयारी केली व बचावाचे धोरण स्वीकारले. इतकेच नव्हे तर मराठी फौजेची सर्व बाजूंनी नाकेबंदी आरंभिली. अधूनमधून चकमकी उडू लागल्या. ७ डिसेंबरला अबदालीला न जुमानता नजीबखान अचानक चालून आला. पण इभ्रामखान व बळवंतरावाने त्याला परतवून लावले. या प्रसंगीच्या लढाईत बळवंतराव गोळी लागून कामास आला.

अबदालीच्या नाकेबंदीमुळे सैन्याला अन्न व जनावरांना दाणावैरण कमी पडू लागली. लोक कंटाळले. उपासमार कोणास सहन होईना. ‘ आम्हाला अन्नाविणे न मारता शत्रूवर घालून मारा ’ अशा विनवण्या झाल्या. भाऊसाहेबाने इभ्रामखानाचा सल्ला घेतला. खानाने लगेच लांबरुंद खडकावर तोफा सज्ज केल्या. मकरसंक्रांतीचा शेवटचा दिवस सर्वांनी गोड करून घेतला. आणि——

१४ जानेवारी १७६१ रोजी पहाटे मराठी फौजेने उठाव केला. १० वाजता संग्रामाला तोंड लागले. ३ वाजेपर्यंत रणकंदन चालले. फौजेला उत्तेजन देण्यासाठी विश्वासराव पुढे घुसला, तो गोळी लागून पडला. भाऊसाहेब देहभान हरपून पुढे झाले ते दिसेनासे झाले. पळापळ सुरू झाली. मल्हारराव, विठ्ठल शिवदेव, दमाजी यांनीसुद्धा पळ काढला. तैनातीतले काही अफगाण शिपाई ऐनवेळी फितूर झाले व त्यांनी मराठ्यांनाच कापायला सुरुवात केली.

'इभ्रानखान गाडदी यांजवर दुराणी येऊन पडले. त्याणे जिवाचा निधडा करून शिपाईगिरी म्हणावी तैशी केली. कित्येक गाडदी खेतीस आले. परंतु कुमक कोणाच्याने जाहाली नाही. मग एक क्षणातच पाच हजार गाडदी ठार जाले होते की नव्हते असे केले. हुजरातीचे लोक जवलचे पलो लागले. तोफखाना बंद जाहला. जातीनिशी तरवार सीमापुरतीच केली जाऊन गिलजाच्या लस्करात मिसळले. आणि दहापाच नामांकित मारून ठार केले. भोंवता वेढा गिलजाचा पडला. अंगावर जखमा भारी चढल्या. दुराणी पळो लागले होते तेही माघारे आले. गाड्यांचे मुड्यांचे ढीग पडले. इभ्रामखान गाडदी याचा पुत्र व भाचा होता तो ठार जाहला. खासा इभ्रामखान गाडदीही रणात घायाळ जाहला, असे असता लढतच होता. यत्न चालेना, तेव्हा हत्यार राहिले. मग धरून नेला.'

घायाळ स्थितीत इभ्रामखानास अबदालीने मोठे आमिष दाखवून स्वत:कडे येण्यास विनविले. पण खानाने भाऊसाहेबाचे व आमचे वचनाचे इनामप्रमाण जाले आहे. त्यासी आसी गोष्ट आपणांपासून कदापि घडणार नाही.' असा बाणेदार जबाव दिला. इभ्रामखानाचा लगेच शिरच्छेद करण्यात आला. अशा रीतीने शेवटच्या घटकेपर्यंत खानाने स्वामीनिष्ठा राखली व शौर्यधैर्याची पराकाष्ठा करून मराठ्यांच्या राज्यासाठी आपला देह ठेवला! कै. दु. आ. तिवारी यांनी रचलेल्या संग्रामगीतात इभ्रामखानाला पुढील सार्थ शब्दात गौरविले आहे.

जातीचा 'खान' परंतू। जो भारत भू – सुत होता.
स्वामिभक्ति दावायाला। 'भाऊसह' पानपताला
इभ्राहिम संगिनवाला। गारदी कटोनी मेला.

० ० ०

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □

# शाहिर प्रभाकर

□ □ □ □ □ □ □ □ □ □ □

शाहीर आणि शाहिरी वाङ्मय यांना पेशवाईतील काळाप्रमाणे आजकाल पुन्हा वैभवाचे दिवस प्राप्त झाले आहेत. 'शाहीर' हा विषय आता केवळ विद्वानांच्या चर्चेचा विषय राहिलेला नाही; तर सर्वसामान्य रसिक वाचकांच्या जिज्ञासेचा व आपुलकीचा तो झाला आहे. ओवळचा मानल्या जाणाऱ्या शाहिरी वाङ्मयाचा दबकत दबकत का होईना, पण आता विद्यापीठ अभ्यासक्रमात प्रवेश झाला आहे. सामान्य वाचकाची शाहिरी वाङ्मयाकडे बघण्याची दृष्टीही सांप्रत निवळली आहे. बोलपटांमुळे अशिक्षित बहुजन समाजात शाहीरांबद्दल आकर्षण निर्माण झाले आहे. प्रस्तुत प्रकरणात पेशवाईअखेरचा प्रभाकर आणि त्याची कवने यांची थोडीबहुत ओळख करून देत आहे.

उपलब्ध साधनांवरून शाहीर प्रभाकराची व्यक्तिगत माहिती मिळते ती अशी : प्रभाकराचे पूर्ण नाव प्रभाकर जनार्दन दातार. दाताराचे मूळ घराणे रत्नागिरी जिल्ह्यातील मुरुडचे. प्रभाकराचे आजोबा कोकण सोडून नाशिक जिल्ह्यात गंगापूर येथे वास्तव्याला आले. प्रभाकर गंगापूरला इ. स. १७६९ च्या आसपास जन्मला. त्याचे वडील सन १७८० च्या सुमाराला पुण्याला आले व कारकुनी करू लागले. प्रभाकरही २०–२२ व्या वर्षी गंगापूर सोडून पुण्याला आला व खंडेराव रास्ते यांच्याकडे कारकुनी करू लागला. या वेळी पत्नी व विधवा भावजय त्याच्यापाशी होती. कुप्रसिद्ध बाळाजीपंत नातू हा त्याच

वेळी रास्त्यांकडे कारकुनी करीत होता. प्रभाकरला दोन भाऊ होते. पण त्यांची विशेष माहिती मिळत नाही. प्रभाकरला एक मुलगा व चार मुली होत्या. मुलगा मोठा होऊन वारला. दोन मुली लहानपणी वारल्या. उरलेल्या दोघींपैकी एक गायकवाडांचा वकील गंगाधरशास्त्री पटवर्धन याच्या मुलाला दिलेली होती. ही मुलगी (यमुनाबाई) १९२० सालापर्यंत हयात होती. प्रभाकराच्या अनेक आठवणी ती सांगे.

पेशव्यांचा आश्रय तुटल्यानंतर इंग्रजी अमदानीत प्रभाकराला दारिद्र्यावस्था प्राप्त झाली. सरदार रास्ते त्याला ८० रुपये वर्षासन देत. परंतु पेशवाईत थाटामाटात रहाणाऱ्या या शाहीराला ही रक्कम काय पुरणार ? पोटासाठी पुणे सोडून मुंबई, ठाणे, बडोदे या ठिकाणी त्याला भ्रमंति करावी लागली व कवने करून श्रीमंतांना संतुष्ट ठेवावे लागले. त्याच्या दारिद्र्यावस्थेचे वर्णन 'महाराष्ट्र–सारस्वत'कारांनी पुढीलप्रमाणे केले आहे. "सवाई माधवरावाचा भरलेला ऐश्वर्यसंपन्न दरबार पाहून ज्याने त्यावर कवन करून म्हटले, त्याला उत्तर–वयात ठाणे येथील कचेरीचे वर्णन करणे भाग पडावे, ज्याने पेशव्यांची आणि शिंदे, होळकर, गायकवाड, पटवर्धन इत्यादी सरदारांची वर्णने आपल्या रसवंतीने गाईली, त्याला मुंबईकडल्या पारशांची आणि सोनारांची आणि इतर लुंग्यासुंग्यांची वर्णने करीत सुटण्याची पाळी यावी आणि वाग्देवीच्या गळ्याला दोरी बांधून दरवेशाच्या अस्वलीप्रमाणे तिला दारोदार नाचविणे भाग पडावे, हे पाहून मनाला मोठा खेद होतो." प्रभाकर इ. स. १८४३ साली वयाच्या ७४ व्या वर्षी वारला. त्याच्या विधवा पत्नीला रास्त्यांकडून वर्षासनाची निम्मी रक्कम मिळत होती. शाहीर होनाजी, परशराम व सगन यांच्याशी प्रभाकराचा परिचय होता. प्रभाकराच्या काही हिंदी कवनांवरून तो हिंदी व उर्दू भाषेशी परिचित होता असे दिसते. प्रभाकर वर्णाने गोरा, मध्यम उंचीचा, सडपातळ, पण मजबूत बांध्याचा होता. पुण्याला त्याचे वास्तव्य भाऊमहाराजांच्या बोळात घाणेकरांच्या वाड्यात होते.

प्रभाकराला काव्यस्फूर्ति १५–१६ व्या वर्षी झाली. तो पुण्याला आला तेव्हा गंगू हैबती या प्रसिद्ध शाहीराचा फड गाजत होता. महादबा सुतार, गुणिराज गंगाधर, दादा वीर, बचु फंदी वगैरे शाहीर मंडळीही या वेळी

पुण्यात करामत दाखवीत होती. प्रभाकर लौकरच गंगू हैबतीच्या फडात सामील होऊन कवने रचू लागला. गंगू हैबती व महादबा सुतार यांच्याशी त्याची विशेष मैत्री जडली. प्रभाकराने कवन करावे आणि हैबतीच्या फडाने ते खड्या व सुरेल आवाजात गाऊन दाखवावे. प्रभाकराच्या बहुतेक साऱ्या कवनात गंगू हैबती व महादबा यांचा गौरवपूर्ण उल्लेख आहे. जातपात विसरून शाहीर मंडळी एकमेकांशी किती एकरूप होत असत याची साक्ष म्हणजे हे उल्लेख होत.

प्रभाकराची कवनसंख्या विपुल नि विविध आहे. पदे, पोवाडे आणि लावण्या अशी तीन प्रकारची रचना त्याने सारख्याच सरसपणे व उठावदारपणे केली आहे. देवादिकांवर व पौराणिक आख्यानांवर त्याची ३० पदे आहेत. राजकीय व्यक्ती व घटनांवर त्याने १३ पोवाडे रचले व लौकिक विषयांवर ११९ लावण्या रचल्या. प्रभाकराला सवाई माधवराव व दुसरा बाजीराव यांचा आश्रय असल्यामुळे व दरबारात त्याचा वावर असल्यामुळे, त्याच्या कवनांवर नागर संस्कृतीची दाट छाया पडलेली दिसते. एक प्रकारचे सुखलोलुप व विलासी जीवन त्याच्या कवनांतून प्रतिबिंबित झालेले आढळते. ' महाराष्ट्र–सारस्वत 'कारांच्या शब्दात सांगायचे झाले तर प्रभाकराची कवने ' गर्भश्रीमंतीत मुरलेली' आहेत. ' रसांचा गाढपणा व भाषेचे प्रौढ, नाजुक, प्रसादपूर्ण ललित स्वरूप ' प्रभाकराच्या कवनातून जे दिसते त्याचे कारण हेच की, त्याच्या भोवतालचे वातावरण नागर होते, थाटामाटाचे होते, किंबहुना विलासी होते. शाहीर मंडळीत श्रेष्ठत्वाचा मान प्रभाकराचा की कुणाचा याबद्दल मागे विद्वानात वाद झाले होते. तथापि भावनोत्कटता, सूक्ष्म अवलोकन, बहारीची वर्णने, प्रसादपूर्ण व ललितरम्य भाषाशैली या गुणात प्रभाकर अजोड म्हटला पाहिजे. त्याच्या लावण्या उत्तान शृंगारामुळे जितक्या हिणकस मानल्या जातात तितकेच त्याचे पोवाडे सुरस, उद्दीपक व वस्तुस्थितीदर्शक मानले जातात. ऐतिहासिक सत्य आणि काव्य यांचा उत्कृष्ट मिलाफ प्रभाकराच्या काव्यात जितका सापडतो तितका इतर शाहीरांच्या काव्यात आढळत नाही.

प्रभाकराच्या पदांवरून तो धार्मिक वृत्तीचा व व्यासंगी गृहस्थ होता असे दिसून येते. शंकर–पार्वती, रावण–मंदोदरी, द्रौपदी–कृष्ण, सावित्री,

हरिश्चन्द्र इत्यादी अनेक पौराणिक व्यक्तींवर पदे रचली आहेत. काशी, पंढरपूर या क्षेत्रांचे महात्म्यही त्याने एकदोन पदांतून वर्णिले आहे. ही पदे वर वर जरी चाळली तरी त्यातून प्रभाकराच्या चटकदार वर्णनशैलीची कल्पना येते. या पदांतून मधूनच विनोदाची झाक दिसेल, तर मधूनच वत्सलतेचा प्रत्यय येईल. कृष्णाच्या मुरलीवर प्रभाकराने तीन मधुर पदे रचली आहेत व त्यात मुरलीचा प्रभाव व त्यामुळे गोपीजनांचा उडालेला गोंधळ याचे मजेदार वर्णन केले आहे. त्याने रचलेली भूपाळी होनाजी बाळाच्या भूपाळीच्या तोडीची नसली तरी मनोरम खास म्हणता येईल. या भूपाळीतील आल्हादक वर्णनाचा हा मासला पहा--

उठ उठ झडकरि हरि गोविंदा मुरारी
अरुणउदय होऊं पाहे सरलि रात्र सारी।
घुसळितात घुमघुम कुणी तक्र काळकाळा
वेणिफणी करून कुणी सुशिल गोपबाळा
सारवून काढितात दिव्य रंगमाळा
हरिगुण गात जाती यमुनेप्रत नारी ।।१।।
जाइजुई बहारभरित शेवंती चमेली
दर्शनास तुळस तुझ्या मुकुंदा भुकेली
वाढवेळ पौढलास का रे पूतनारी...

प्रभाकराचे पोवाडे म्हणजे अक्षरशः 'मराठ्यांचा काव्यमय इतिहास', होय. रंगाच्या व सवाई माधवरावाच्या मृत्यूवरील पोवाड्यात त्याने आपल्या वर्णनशैलीची करामत प्रकट केली आहे. दि. १९-१०-१७९२ ला सवाई माधवराव पेशवे महादजी शिंद्यांच्या आग्रहावरून रंग खेळले व त्या दिवशी त्यांची थाटामाटाची मिरवणूक निघाली होती. या अपूर्व मिरवणुकीचे प्रभाकराने केलेले काव्यमय चित्रण पहा--

जसा रंग श्रीरंग खेळले वृन्दावनि द्वापारात
तसा रंग श्रीमंत खेळले कलियुगात अति आदरात

मधे मुख्य अंबारि झळाळित मागे थाट अंबाऱ्यांचा
चंद्रबिंब श्रीमंत सभोंवता प्रकाश पडला ताऱ्यांचा
हौद हांडे पुढे पायदळात पाउस पडे पिचकाऱ्यांचा
धमाधार अनिवार मार भर बंबांच्या फटकाऱ्यांचा
घरोघरी नारी झुरझुरुक्यातून सजुन उभ्या शृंगारात
गुलाल गर्दा पेल दुतर्फा रंग रिचविती बहरात
आधिच पुणे गुल्जार तशामधे अपूर्व वसला आदितवार
त्यात कृष्ण श्रीमंत आवंतर समस्त यादव परिवार.

सवाई माधवरावाच्या मृत्युप्रसंगावरील पोवाडा म्हणजे मूर्तिमंत करुणरस; नव्हे, एक विलापिकाच होय. 'कमि नव्हते पृथ्वीत अवांतर प्राणी न्यायाला। औक्ष कसे कमी झाले सवाई माधवरावाला' या आर्त स्वराने पोवाड्याची सुरुवात होते. पोवाड्यात सवाई माधवरावाच्या पत्नीचा विलाप वर्णिला आहे, पशुपक्ष्यांनी केलेल्या मूक दुःखाचे चित्रण आहे आणि शेवटी पेशवे वंशाबद्दल धन्योद्‌गार आहेत. हा पोवाडा वाचताना चित्त द्रवणार नाही, त्याला मुक्त अथवा पशूच म्हणावे लागेल! खर्ड्याच्या लढाईवरील व दुसऱ्या बाजीरावावरील पोवाडे असेच रसोत्कट व अमोलिक आहेत. बाजीरावाच्या चढत्या व पडत्या काळाचे प्रभाकराने केलेले अलंकारिक वर्णन किती सुरस आहे पहा—

चढता काळ—

धन्य प्रभू पेशवे ज्यांचे ऐश्वर्य बघुन मन रिझे
परशत्रूंचे सैन्य ठायिच्या ठायी प्रसंगी थिजे
सुखी केला मुलखात केशरी भात घरोघर शिजे
गृहस्थ-भिक्षुकांचे गौरवे तुपात मनगट भिजे
तीर्थोतीर्थी नित्य शेरभर सोने सकाळी झिजे
नाही दुःख कोणास पलंगी आनंदात जन निजे.

पडता काळ——

विपरित आला काळ मेरुला गिळिले मुंग्यांनी
पंडितास जिंकिले सभेमधे मदांध भुंग्यांनी
भीमास आणिले हारीस रणांगणी अशक्त लुंग्यांनी
कुबेरास पळविले अकिंचन कसे तेलंग्यांनी
जळी राघव माशास अडविले असंख्य झिंग्यांनी
जर्जर जाहला विष्णुवाहन बदकांचे दंग्यांनी...

साध्वी अहल्याबाई, बडोद्याचे गायकवाड राघोजी आंग्रे, पेशवे वंश, नाना शंकरशेट इत्यादी विषयांवरील प्रभाकराचे पोवाडे फारसे उत्कृष्ट नाहीत. आश्रयदात्यांची स्तुति आणि स्वतःची लाचारी या पोवाड्यातून विशेष आढळते. अर्थात त्यातूनही प्रभाकराची मार्मिक दृष्टी दिसून येतेच. उदाहरणार्थ, अहल्याबाईवरील पोवाड्यात प्रभाकर तिला 'दीनदुबळयांची आई' असे संबोधून पुढे 'संसारी असून वासना जिच्या मेल्या, तिजपुढे सहज मग मुक्ति उभ्या ठेल्या' या सार्थ शब्दात तिचे संकीर्तन करतो. दुसऱ्या सयाजीरावावरील पोवाड्यात महाराजांच्या औदार्याचे भरघोस वर्णन करून प्रभाकराने शेवटी याचना केली आहे, की——

प्रभाकर कवी भ्रमर गुन्तला पहा कर्जाच्या कमळात
द्रव्यकृपेचा प्रकाश पडल्या सुटून जाईल स्वकुळात.

पदे आणि पोवाडे यांच्याकडून प्रभाकराच्या लावण्याकडे वळले म्हणजे मात्र काहीशी निराशा पदरी येते. त्याच्या बहुतेक लावण्यांना 'मदनविंचू झोंबला' असल्याने 'प्रतिष्ठित सभेत' गाण्याला त्या अपात्र आहेत. त्याची शृंगारनायिका रतिसुखासाठी सदोदित हपापलेली आहे व त्याचे शृंगारनायक तर विषयांधतेचे निव्वळ पुतळे आहेत. प्रभाकरासारखा उच्च कुळातील व धार्मिक प्रवृत्तीचा शाहीर आपल्या लावण्यांतून उत्तान व अश्लील शृंगाराचा मनमुराद आविष्कार का करतो हा मोठा प्रश्न पडतो. त्याच्या आयुष्यात एखादी 'बया' तर आलेली दिसत नाही; मग या शृंगारातिरेकाचे कारण काय ?

एक–दोन कारणे संभवतात. त्याच्या उत्तान लावण्यापैकी कित्येक लावण्या ‘बाजीरावाची भ्रष्ट रुचि भागविण्यासाठी’ लिहिलेल्या असाव्यात. आपल्या आश्रयदात्याची शृंगाराभिरुचि भागविण्यासाठी प्रभाकर तशा लावण्या रचणे सहज शक्य आहे. तथापि ज्यात बाजीरावाचा संबंध नाही अशाही अनेक लावण्यात तो मुक्तपणे प्रणयक्रीडा वर्णन करतो. प्रभाकराच्या काळी सारा समाजच विलासमग्न झाला होता काय? होय, निदान स्वतः शाहीर ज्या इतर सरदार, जहागिरदार व दरबारी मंडळींत वावरत होता, तो समाज तरी विलासप्रिय खास होता. एरवी अशा लावण्या रचण्याचे प्रभाकराला प्रयोजन काय? तो स्वतः तर सात्त्विक प्रवृत्तीचा गृहस्थ दिसतो. परदारागमनाचा त्याने दोन-तीन लावण्यातून निषेधही केलेला आढळतो. त्याच्या मते ‘परस्त्री विषाची सुरी’ आहे. त्याची एक नायिका म्हणते,—‘असा असो जन्मोजन्मी आवडता स्वामी ग। रत नसो परक्या ठायीं परस्त्रीच्या कामी ग ॥’ अन्य एका लावणीत तर प्रभाकर खडखडीतपणे बजावतो की, ‘परस्त्रीच्या पायी विराटसदनी कीचक संहारिला। शिळाश्वेतु बांधून दशानन भरताग्रजे मारिला। व्हा सावध तुम्ही तरी नका होऊ लंपट परनारिला ॥’ अर्थात अशा लावण्या मोजक्या आहेत व त्यातील वातावरणही कौटुंबिक आहे. बहुतेक लावण्यांचा झोक ‘मैथुनसुखा’कडेच आहे. ‘सर्व सुखाहून मोठे मैथुनसुख रे’ असे मानणाऱ्या नायकाला ‘येऊ द्या द्रव मनाला जरा’ असे विनविण्याची पाळी नायिकेवर यावी, यावरून या सर्व लावण्यातील हीन अभिरुचि दिसून येते.

प्रभाकराच्या लावण्यांचा हा हिणकस भाग सोडला व त्याच्या इतर काही चांगल्या लावण्यांचा विचार केला की, मग मात्र त्याच्या काव्यशक्तीचे कौतुक करावेसे वाटते. त्याच्या लावण्यातील समाजविश्व नागर व छोटे असले तरी नेटके, गर्भश्रीमंत, रसिक, धार्मिक व कौटुंबिक धाग्यादोऱ्यात गुरफटलेले आहे. संक्रांत, शिमगा व नागपंचमी हे सण या समाजविश्वात मोठ्या डामडौलाने साजरे होतात. या समाजविश्वातील स्त्रीपुरुषांना रंग उडविणे, गोडधोड खाणे, नट्टापट्टा करणे, दागदागिन्यांनी सुशोभित होणे, घरे शृंगारणे, प्रणयकूजनात दंग होणे इत्यादी गोष्टी फार प्रिय. सुखासीन जीवन ज्याला म्हणता येईल ते या लावण्यातून प्रतिबिंबित होते. दुःखाचे

ढग या जीवनात कधी डोकावत नाहीत असे मात्र नाही. पुत्रासाठी हपापलेली व त्यासाठी तऱ्हेतऱ्हेचे उपाय करणारी स्त्री या समाजात अवश्य भेटते. बाहेरख्याली प्रियकराचा संशय घेणारी व त्याचा निषेध करणारी स्त्री येथे आहे. याउलट पत्नीचा संशय घेणारा व मुलूखगिरीवर निघताना मागे वळून पहाणारा पतीही या समाजात आढळतो. विरह आणि मीलन या प्रणयाच्या दोन्ही छटा प्रभाकराच्या लावण्यात उमटलेल्या आहेत. मीलनाच्या अर्थात अधिक.

शृंगार हा प्रभाकराच्या लावण्यातील प्रधान रस. विप्रलंभ आणि संभोग हे दोन्ही प्रकार त्याने बिनदिक्कत आविष्कृत केले आहेत. करुण, हास्य क्वचित बीभत्स रसांचाही तो अवलंब करतो. बाजीरावावरील लावण्यातून कारुण्याची धार विशेष प्रचीतीला येते. 'आहेस ठाऊका भिकार...जल जा पलीकडे मुरदाडा' ही लावणी हास्य आणि बीभत्सरसाच्या दृष्टीने उल्लेखनीय म्हणता येईल. अलंकारांच्या बाबतीत प्रभाकराची मदार शब्दालंकारावर अधिक आहे. यमक आणि प्रासांचा वापर त्याने अगदी मुक्तहस्ताने केला आहे.

प्रभाकराच्या लावण्यातून त्याच्या व्यक्तिगत जीवनाबरही थोडा प्रकाश पडतो. निरनिराळ्या स्त्रियांची त्याने जी मार्मिक मनोरम वर्णने केली आहेत, त्यावरून त्याची सौंदर्यदृष्टी दिसून येते. सामाजिक चालीरीतीचे व मानवी मनोव्यापारांचे त्याचे निरीक्षण सूक्ष्म आहे. त्याच्या सौंदर्यदृष्टीतून पंक्तीत वाढणारी 'पल्लेदार पदराची' स्त्रीसुद्धा सुटू शकत नाही. पिवळ्या रंगाचे आकर्षण त्याला बरेच असावे. 'कंठ तुझा मंजूळ' या सुंदर लावणीवरून संगीतकलेशी तो चांगला परिचित असावा, असे दिसते. पुणे शहराविषयीचा अभिमान प्रभाकराने चारपाच लावण्यातून प्रकट केला आहे. पेशवेवंशाबद्दल त्याच्या मनात निरतिशय भक्ती असावी हे तर साहजिक आहे. प्रभाकर पुण्याला 'अमरपुरी, द्वारका, गुलजार' अशा विशेषणांनी संबोधितो, तर पेशव्यांचा उल्लेख 'धन्य प्रभु, पुण्यशील' असा करतो. स्वतःच्या कवित्वाबद्दल त्याने अनेक कवनातून आत्मस्तुती केली आहे, व ती बहुतांशी खरी आहे. 'मधुर दिलदारी, कडकडीत, अमौलिक, अमृतासमान, अक्षर साध्या चाली, मान डोलवी सभा, अंतःकरण भेदिती' इत्यादी त्याचे

उद्‌गार अतिशयोक्तीचे नाहीत. संत कवींना जिथे आत्मस्तुतीचा मोह आवरला नाही तिथे प्रभाकरासारख्या शाहिराची काय कथा? शाहीर मंडळीत प्रभाकराचे स्थान कोणते अशा प्रकारची चर्चा पूर्वी होत असे. अशी चर्चा व्यर्थ आहे. कारण जो तो शाहीर आपल्या समाजजीवनाचे संस्कार घेऊन आलेला आहे व काळाची गरज ओळखूनच त्याने कवने रचिली आहेत. या दृष्टीने प्रत्येक शाहिराची काहीएक वैशिष्टयपूर्ण करामत आहेच. म्हणूनच प्रभाकराच्या स्थानाची चर्चा न करता त्याच्या वाङ्मयाचे रसग्रहण करणे हाच उचित मार्ग.

० ० ०

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
दा. क्र. ९८४५ दिनांक २३।११।७५
विषय काव्य

खास कुमार वाचकांसाठी
म. श्री. दीक्षित यांनी लिहिलेली
चित्तवेधक चरित्र – पुस्तके

- जिजामाता
  जिजाबाईचे रसाळ, स्फूर्तिदायक चरित्र
- पुण्यश्लोक अहल्या
  अहल्याबाई होळकरांची जीवनगाथा
- सत्तावनचे सप्तर्षी
  १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतलेल्या अजरामर व्यक्तींच्या चरित्ररेखा
- पेशवाईतील रत्ने
  पेशवाईतील वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तींचा परिचय
- पिचलेली मनगटे
  पराक्रमी परंतु अपयशाचे धनी झालेल्या इतिहासातील काही तेजस्वी व्यक्ती
- तेजस्वी तारका
  इतिहासातील तेजस्वी स्त्री रत्नांचा परिचय
- तात्या टोपे
  १८५७ च्या समराचा शूर सेनानी तात्या टोपे याचे पराक्रमाने ओथंबलेले चरित्र
- ...डित जवाहरलाल नेहरू
  ...ंची व्यक्तिरेखा प्रभावी भाषाशैलीत
  ...कार करणारे चरित्र

...शः प्रकाशित होत आहेत.

BVBK-0401847

अतुल प्रकाशन